# डॉ. नितीन मोरे

# नाच जमूरे नाच



# नाच जमूरे नाच !

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# नाच जमूरे नाच !

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २५ सप्टेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रस्तावना

## विसंगति सदा घडो !

मागे मोरोपंत त्यांच्या काळात 'सुसंगति सदा घडो' असे काहीसे सांगून गेले. सांगोत बापडे.

आता दिवस बदलले हे खरे ! सुसंगति घडो न घडो, आज जमाना विसंगतीचा आहे.

Perfect mismatch असा ही एक प्रकार असतो म्हणतात !

तर असे हे दिवस.

कथनी नि करणी यांचा ताळमेळ बसला तर आजच्या या जगात कसा निभाव लागायचा?

तेव्हा एकूणच समाजाकडे उलट्या चष्म्यातून पाहण्याचा हा प्रयत्न !

उपरोधाचे हे बोल पसंत पडावेत ही अपेक्षा.

डॉ.नितीन  मोरे

**अर्पणपत्रिका**

**आमच्या शाळेतील मराठीचे श्री. सामंतसर यांस कृतज्ञतापूर्वक...**
**सरांमुळेच आम्हांला मराठीची गोडी लागली.**

डॉ.नितीन मोरे

अनुक्रमणिका

१. नाच जमुरे नाच

२ . जगात वागावे कसे?

३ . एकविसाव्या शतकातील मूर्खांची लक्षणे

४. पुतळयांच्या देशा

५. विचारवंताचा 'वामना'वतार

६ . गणपती बाप्पा आणि मूषक सवांद

७. दु:खहर्ता सुखकर्ता

८. गणपत श्रीपती संवाद : एक श्रुतिका

९ . नवयुग फर्निचर : नव्या युगाची नवी सुरूवात

१० . जागतिक अंधश्रद्धादिना निमित्ताने

११ . हसा मुलांनो हसा

१२.'क' करियर चा

१३.पर्यावरण दिना निमित्ताने

१४..करमणूक 'कर'मणूक

१५. क्रांती krnty उत्क्रांती :

१६ . त्यांची ( रड ) कथाच वेगळी  अर्थात : रडकथा २०१६, एक trilogy

या संग्रहातील सर्व लेख हे काल्पनिक असून त्यांतील व्यक्ती, स्थळे, प्रसंग यांचे कोणाला स्वतःशी साम्य दिसून आल्यास त्यांनी ते कोणाला सांगू नये.

उगाच स्वतःचे हसे करून घ्याल.

हे हे हे !!!

१

## नाच जमुरे नाच

‘मेहरबान, कदरदान, मायबाप ! दिल थाम कर देखो‘

‘जमुरा, नाच दिखायेगा?‘

‘दिखायेगा‘

‘कौनसा नाच दिखायेगा, जमुरे?‘

‘कौनसा चाहिये? कथ्थक, कुचिपुडी, भरतनाट्यम, बॉलिवूडस्टाईल कि डिस्को?‘

‘जमूरे, तू तो बडा ऍडवान्स्ड हो गया है रे‘

‘जी मालिक. मेरी वेबसाईट देखो‘

‘वेबसाईट? जमुरे की? चल कुचिपुडी दिखा‘

‘नही होगा‘

‘तो कथ्थक‘

‘नो‘

‘भरतनाट्यम‘

‘Imposs‘

‘तो बचा क्या?‘

‘कुछ नही‘

‘मग मोठे तोंड करून बोलत होतास‘

‘वचनें किम दरिद्रत:‘

‘जमुरे, तू काय मराठी भाषेचा क्लास लावलायस की काय?‘

‘See my website‘

‘बाप रे ! इंग्लिशचा पण?‘

‘मारी वेबसाईट जोईलो एकवार‘

‘जमुरे, तू माझ्या एकही प्रश्नाचे उत्तर दिलं नाहीयेस‘

‘तुम्ही मालिक, प्रश्नच नाही विचारलात अजून, आणि रिफर टू आमादेर वेबसाईट‘

‘आता कुठली भाषा उरली?‘

‘कुठलीही असो पण तुम्ही काही विचारायचे थांबत नाहीत एवढ्या भाषेत सांगूनही‘

‘जमुरे, तू बदलला आहेस‘

‘बदल हा स्थायीभाव आहे आयुष्याचा‘

‘वा ! फिलॉसॉफर चल खेल दिखा‘

‘नाच? तो अबतक क्या था?‘

‘क्या खेल दिखाया?‘

‘मै हूं जमुरा. अबतक शब्दोंका खेल ही तो था‘

‘वा ! तू तर मोठा माणूस झालास‘

‘मग, मी रोज आपल्या नेत्यांची भाषणे ऐकतो‘

‘मग नाचाची प्रॅक्टिस कधी करतोस?‘

‘तीच‘

‘तीच काय?‘

‘तीच माझी तालीम‘

‘कसली?‘

‘नाचाची नि नाचवण्याची‘

‘नाचवण्याची? कुणाला?‘

‘कुणाला काय? आता काय चालू आहे?‘

‘काय?‘

‘नाच‘

‘कोणाचा?‘

‘तुमचा मालिक, आज जमुरा नचायेगा मालिक को‘

‘जमुरे, तूने तो अपनी हद छोड दी‘

‘हां, मै बेहद खूश हूं‘

‘छोड चल, आज तक ऐसा जमुरा नही देखा‘

‘इसके आगे देखोगे, you will see henceforth‘

‘जमुरे, मी परेशान आहे, या लोकांना खेळ काय दाखवू?‘

‘हाच खेळ. बच्चे लोग ताली बजाव’

‘जमुरे, आखिर तू है कौन?‘

‘मैं? जमुरा‘

‘ते तर ठाऊक आहे, पण तू इतका हुशार आणि पढालिखा?‘

‘पढालिखा ठीक आहे पण हुशार? कौन बोला?‘

‘जमुरे तुम बोलताय तो समझता है‘

‘तो फिर नौकरी देव मेरेकू‘

‘नौकरी? तो तू आता जमुरा नसणार? आखिर तुम हो कौन?‘

‘कौन? Unemployed postgraduate, आजही मुझे employment exchange से यह जॉब मिला है, जमुरेका. आज मेरे पहले नौकरीका पहला दिन‘

‘जमुरे, बाते मत बना, चल नाच दिखा‘

जमुरा नाचू लागतो, जमेल तसा.

‘मेहेरबान, कदरदान. बच्चालोग बजाव ताली. बडे बुजुर्ग करो पाकिट खाली, पापी पेट का सवाल है, नाच जमुरे, नाच. जो जी मे आये नाच. जैसे भी आए नाच, नाच जमुरे नाच.‘

२

**जगात वागावे कसे? ( अर्थात : सुखी होण्याचा मूलमंत्र )**

फार वर्षांपूर्वी 'जगात वागावे कसे?' हे पुस्तक वाचल्याचे आठवते. या पुस्तकांची गंमत अशी असते की त्यात सांगितलेले चिकारसे कॉमन सेन्स मधलेच असते. शिवाय छापील अक्षरांना लेखकच स्वत: घाबरतो तेव्हा अगदी खरा सल्ला दिला जात नाही. आम्ही आता साठीत आलो. जग पाहून झाले. पुस्तके वाचली, पण शेवटी आम्हाला हवे तसेच वागलो. व्यवहार ही शिकण्याची गोष्ट आहे. तरी खराखुरा मंत्र द्यावासे वाटते. सुखी व्हावे कसे नि जगात वागावे कसे हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे एक जरी जमले तर दुसरे एकावर एक फ्री म्हटल्यासारखे मिळतेच. यातील कित्येक बाबी वाचकांनी आपापल्या जोखीमीवर पाळाव्या. यातील सल्ले हे दुसरीकडे कुठे मिळण्याची शक्यता नाही पण तरी ते पाळण्याने झालेल्या नफानुकसानीस सदर लेखक जबाबदार राहणार नाही हा वैधानिक इशारा देऊन ठेवतो. हे ही एक आम्ही कमावलेले व्यावहारिक शहाणपण

**<u>मेहनतीस पर्याय नाही.</u>**

लहानपणापासूनच मेहनतीची सवय लावा. विद्यार्थी दशा ही खरीखुरी दशा व्हावयास नको असेल तर मेहनतीस पर्याय नाही. अभ्यास तर बहुतेक करतातच पण यशस्वी काही थोडेच होतात. दिवसरात्र एक करूनही यशाची गॅरंटी मिळू शकत नाही. यावर कॉपी करणे हाच एक रामबाण इलाज आहे. आपला अभ्यास कोठला प्रश्न कोणत्या पाठातील आहे हे कळण्याइतपत ठेवा. बाकी मेहनत कॉपी करण्याची कला अवगत करण्यासाठी करा. त्यात पकडले न जाण्यासाठी आपली मेहनतपणाला लावा. मेहनतीशिवाय यश नाही हे मात्र खरे. मेहनत योग्य दिशेने करा.

मोठ्यांनाही मेहनतीस पर्याय नाही. फक्त आपापल्या कार्यक्षेत्रानुसार त्याची दिशा ठरवा. बहुतेकदा मराठी माणूस हा नोकरदार असतो. त्यामुळे त्यास डोळ्यासमोर ठेऊनच हे लिहिले गेले आहे. अन्यांनी आपापल्या कुवतीनुसार त्यात बदल करावा. किंबहुना स्वव्यवसायातील थोड्यांस हे वाचावयाची फुरसतच मिळायची नाही हे आम्हास ठाऊक आहे.

कामाकडे काम म्हणूनच पाहा. काम आपल्यासाठी असून आपण कामासाठी नाही हे ध्यानात ठेवा. ऑफिसातील कामे करणे हा आपला पोटापाण्याचा व्यवसाय आहे हे लक्षात ठेऊन वागा, जे काम आपल्याला उदरनिर्वाहास मदत करते त्याचा फडशा पाडण्याचा कृतघ्नपणा करू नका.

**कामचुकारपणा दुर्गुण नव्हे तर सद्गुण.**

'पळत्या बैलास मार जास्त' हे लक्षात ठेवा. दुसऱ्यांवर कामे ढकला. याबाबतीत खास विचार करा की इतरांना कामे कशी मिळतील. यास काही जण 'काम ढकलणे' म्हणतात. आम्ही ही हेच म्हणतो. पण आपले मन साफ ठेवा. सुखी होण्यासाठी हे आवश्यक आहे याची खूणगाठ मनाशी बांधून ठेवा. सरकारी नोकरीत असल्यास गाढव सारखे नि घोडा ही सारखा हे ध्यानात ठेवा. दोघांना सारखाच पगार मिळतो. आपले टेबल वेळेवर साफ केल्यास आपल्याकडे अजून काम नि जबाबदारी येईल याकडे लक्ष द्या. तेव्हा काम पुरवून पुरवून करा. काम जमत नसल्याचा बहाणा हवा तिथे नीट करा. यासाठी अभिनय नीट जमण्यासाठी मेहनत करा. साध्या साध्या गोष्टी जमत नाहीत असे लक्षात आल्यास मोठी कामे नि जबाबदाऱ्या आपल्यावर येणार नाहीत. आपली अशीच इमेज जाणीवपूर्वक तयार करा. फक्त पुढच्या प्रगतीसाठी आपल्या बॉसला खूष ठेवण्यासाठी त्याच्या पुढे पुढे करायला चुकू नका. बॉसची खाजगी कामे अपवादात्मक अशा शिताफीने करा. ऑफिसच्या कामात जेवढे मागे राहाल तेवढेच बॉसच्या खाजगी कामात पुढे रहा. समजा तुम्ही सरकारी दफ्तरात ड्रायव्हर आहात. ड्रायविंगसाठी लागणारी स्किल्स असल्यानेच तुम्ही नोकरीला लागला आहात. आता काही काळाने तुम्हाला कोणीच काढू शकत नाही. तेव्हा काहीही बहाणे करा. टेनिसमध्ये नॉन प्लेइंग कॅप्टन असतो तसे नॉन ड्रायव्हिंग ड्रायव्हर बना. गाडी चालवणे सोडून तुम्हाला कोणी दुसरे काम देणार नाही नि कामावरून काढूनही टाकणार नाही. सरकारी नोकरीत अशा संधी जास्त तेव्हा सरकारी नोकरीत चिकटण्यासाठी मेहनत करा. पंतप्रधान नि मंत्री हे देखील टेंपररी असतात तर सरकारी नोकरीत असलेला चपरासी मात्र पर्मनंट असतो हे ध्यानात ठेवून अशी नोकरी मिळवण्यामागे लागा.

कामे करताना ती चोख करा पण तिच्यात काही चुका करायला विसरू नका. तुम्ही अकार्यक्षम असल्याचा शिक्का पडेल असेल वागा म्हणजे तुमच्यावरील कामाचा भार

वाढणार नाही. साहेबाच्या पुढेपुढे करा पण तो साहेब तुमच्याच पंथातील नाही याची खात्री करून घ्या.

साहेबाकडे फायली नेताना त्यात विचारायला काही शंका तयार ठेवा. हे प्रश्न सोपे असतील आणि साहेबाचा इगो दुखावला न जाणारे असतील याची काळजी घ्या. कठीण प्रश्न सोडवायला ज्यांच्याकडे अधिकार नाही अशाच सहकाऱ्यांची मदत घ्या. आपल्या फायलीत मध्ये मध्ये सहज दिसतील अशा चुका पेरून ठेवा. म्हणजे त्या दाखवताना साहेबास बरे वाटेल. या साठी नेहमी 'यस सर', 'नो सर', 'सर?' 'सर !' 'सर सर ..' असे वेगवेगळया पद्धतीने म्हणण्याचा सराव करा. आपले काम शंभर टक्के नीट करण्याने खालील धोके संभवतात.

१. साहेबाचा इगो दुखावतो. आपण त्याला धोकादायक वाटू शकतो.

२. आपल्याकडे अजून जास्त काम येऊ शकते.

३.कार्यक्षम म्हणवण्याचा धोका होऊ शकतो.

या धोक्यांपेक्षा कामे अर्धवट करणे जास्त श्रेयस्कर. काही काही साहेबांना 'पेप टॉक' देऊन सर्वांना कामास लावायची सवय असते. यास काही लीडरशिप क्वॉलिटीही समजतात. कुत्र्यांपासून राहाता तसे अशा साहेबांपासून सावध रहा. No one dies of hard work हे खरे पण No one dies of laziness हे तुम्हाला कोणीच सांगितले नाही, हे सदैव ध्यानात ठेवा. आपली मुद्रा नेहमी उदास ठेवली तर आपल्याकडे कोणी कामासाठी यायची शक्यता कमी होते. तसा चेहरा ठेवायची प्रॅक्टिस करा. मेहनतीस पर्याय नाही हे आम्ही आधीच सांगितले आहे.

तुम्ही स्वत: अधिकार पदावर असाल तर कोणताही निर्णय घेऊन वादग्रस्त होऊ नका. घोंगडे भिजत घालतात तशा फायली भिजत घालायला शिका. जेव्हा आपण काही निर्णय घेतो तेव्हा काही जणांवर तरी अन्याय होऊ शकतो. तेव्हा निर्णय न घेऊन हा अन्याय टाळा. देवादारी सर्व जण समान असताना तुम्हीच हा निर्णय का घ्यावा? आपण indispensable नाही याची खात्री बाळगा. आपला अधिकार आपल्या हाताखालील लोकांवर चालवा. त्यांस दुय्यम वागणूक देऊन त्यांच्याकडून कामे करवून घ्या. आपल्या वरचे अधिकारी आपणास हीच वागणूक देतात आणि आपल्या हाताखालील लोक ही त्यांच्या हाताखालील लोकांस तसेच करतात त्यामुळे याबद्दल मनात खंत बाळगू नका.

अगदीच उच्चपदस्थ असलात तर आपल्या निर्णयांची जबाबदारी आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांवर कशी जाईल हे पहा कारण येथे निर्णय कधी कधी घ्यावे लागतातच.

अधिकार पदावर नसलात तरी प्रत्येकास कोणता ना कोणता अधिकार असतोच. समजा तुम्ही गाड्या पार्क करण्याच्या जागी वॉचमन आहात. वॉचमन हा काही मोठा हुद्दा नाही. तरीही तुम्ही अधिकार गाजवून दाखवू शकता. तिकडून एखाद्या बड्या माणसाची मर्सिडिज जरी आली तरी तुम्ही अधिकाराने त्याला 'गाडी इधर मत लगाव' किंवा 'थोडा सीधा लगाव' असे दरडावू शकता. तेव्हा अधिकार असावयास तुम्ही कोणी मोठी व्यक्तीच असावयास हवे असे नाही.

आपल्या अधिकाराचा वापर आपल्याहून खालच्या लोकांवर करा. त्यात कोणाचे भलेबुरे होईल असा संकुचित विचार करू नका. फळाची अपेक्षा बाळगू नका. आपल्या बागेत नेहमी फुलझाडेच लावा.

**मोठ्यांचा आदर करा**

साहेबाच्या 'हो' त 'हो' मिळवा. मोठ्यांचा आदर करायला आपली संस्कृतीच शिकवते. अधिकारपदी तो मोठा हे विसरू नका. याला कोणी लाळघोटेपणा म्हणेल. आम्ही ही तेच म्हणतो. तुम्ही स्वत:स साहेबांचे होयबा म्हणवून घ्याल. पण अंतिम सुखासाठी या गोष्टींचा बाऊ करू नका. साहेबास कधीच 'नाही' म्हणू नका. त्यास वाईट वाटेल असे वागू नका. त्याने आपली पुढची प्रगती खुंटण्याचा धोका आहे हे लक्षात ठेवा. तसेच नेहमी दुसऱ्यांचा विचार केल्याचे पुण्य ही तुम्हाला लागू शकते. आपल्या घरी देखील मोठ्यांचे ऐका. बहुधा ते 'विश्रांती घे', 'जेऊन घे' किंवा 'अती काम करू नको', 'तब्येत सांभाळ रे बाबा' असेच सल्ले देत असतात. ते ऐकण्याने आपलाच फायदा आहे हे लक्षात ठेवा.

**Health is wealth हे खरे. त्यासाठी जे लागेल ते करायला कचरू नका.**

प्रकृती सलामत तो नोकरी पचास. तेव्हा त्यासाठी तब्येत सांभाळा.

अतिविचार टाळा. किंबहुना विचार करणेच टाळले तर अधिकस्य अधिकं फलं. दुसऱ्यांचा तर अजिबात विचार करू नका. त्यांच्यावर कोणताही उपकार आपल्या हातून होणार नाही याची काळजी घ्या. त्यामुळे त्यांस तुमचे मिंधे व्हावयास लागेल. त्यामुळे अशी मदत टाळा.

आपल्या मनात काहीच साचून राहू देऊ नका. त्यामुळे हृदयावर ताण येतो. तेव्हा जे मनात येईल ते बोलून टाका. कोणी त्यास फटकळपणा म्हणेल. आम्हीही तेच

म्हणतो. पण तरी तो सोडू नका. आपली तिरसटपणाची इमेज मेहनतीने बनवा म्हणजे तुमच्याकडून कोणी काहीच अपेक्षा ठेवणार नाही. तुम्ही एखाद्या ऑफिसच्या Help च्या काउंटरवर असाल किंवा चौकशी विभाग सांभाळत असाल तर या गुणाचे संवर्धन करा.

आपल्या हृदयाचे ऐका. पोटाचेही ऐका. भूक लागली असे वाटले तर लंच टाइमची वाट बघत राहू नका. प्रथम जेऊन घ्या, काम होतच राहते. आजपर्यंत एखाद्यामुळे काम अडले असे झालेले नाही. स्वत:स indispensable समजू नका. तसेच भुकेल्या पोटी काम नीट झाले नाही तर कामावर अन्याय होईल. नेहमी न्यायानेच वागा. आपल्याला वाटेल त्या गोष्टी करून मोकळे व्हा. मनात कुढत राहू नका. समजा तुम्ही आणि तुमचा मित्र एखाद्या भाषणास गेला आहात. एरव्ही तुम्ही असे करत नाही, पण नाइलाजाने जावेच लागले. तेथून सुटण्याचा मार्ग नाही. कंटाळ्याने झोप येते. तर बिनधास्त झोपून जा. तुमच्या पुढे बसलेला माणूस चेक्सचा शर्ट घालून बसला असेल तर मित्र आणि तुम्ही मिळून निर्धास्त पणे त्यावर फुल्ली गोळा खेळा. शर्ट ही नाशवंत गोष्ट आहे त्याची काळजी करू नका.फक्त लिहिताना त्या माणसास गुदगुल्या होऊ नये याची काळजी घ्या. तो हलला तर तुमच्याच गेम मध्ये बाधा येऊ शकते.

येणाऱ्या जाणाऱ्यांना आपल्या तब्येतीच्या तक्रारी ऐकवा. अगदी एखादा जिवावरच्या दुखण्यातून उठला असेल तरी त्यास तो तुमच्या पेक्षाही फीट आहे असे वाटले पाहिजे. हॉस्पिटलात एखाद्या पेशंटला भेटायला गेलात तर आपले दूरचे काका अशाच आजारात कसे गेले ही स्टोरी ऐकवायला विसरू नका. खरा काका नसेल तर मानलेला काका तरी असेलच. यामुळे पेशंटच्या मनाची तयारी करायचे महान कार्य तुम्ही करत आहात हे समजून समाधानी व्हा.

## तुलना करायला शिका

देवाघरी सर्वच समान आहेत. असे असताना दुसऱ्या कोणास तुमच्या पेक्षा जास्त काही मिळत नाही ना याकडे लक्ष ठेवा. तुम्हाला सुद्धा तितकेच मिळणे हा तुमचा हक्क आहे. आपल्या हक्कांसाठी जागरूक रहा. तुम्हाला जर इतरांहून जास्त मिळाले तर तो इश्वराचा प्रसाद मानून त्याचा स्वीकार करा. स्वत:स देवाचे लाडके समजा. अर्थात तुम्हाला जास्त मिळाले याचे कारणच ते आहे.

**<u>शहाणे बना.</u>**

जगातील खूपशी दु:खे शहाणपणाच्या अभावाने आली आहेत असे सद्‌गुरू श्री. छगनलाल सतपाल म्हणतात. तेव्हा शहाणे बना. अतिशहाणे झालात तरी चालेल. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' असे म्हणतात. तेव्हा पुढच्याकडे लक्ष ठेवा. त्यास ठेच कधी, कशी आणि कुठे लागते याकडे ध्यान असू दे. या मध्ये वेळ जास्त जातोय असे वाटले तर तशी ठेच लागायची व्यवस्था करा. Time is money म्हणतात तेव्हा वेळ वाचवा.

**<u>कोडगे बना</u>**

निर्ल्लजं सदासुखी म्हणतात. सुखी आयुष्याचा मार्ग निर्ल्लजपणातून जातो हे आपल्या पूर्वजांना ठाऊक होते. सुखी माणसाच्या सदऱ्याची गोष्ट सर्वांनीच ऐकली आहे. निर्ल्लजं सदासुखी आणि ही गोष्ट एकमेकांशी संबंधित आहे हे मात्र तुम्हाला कोणीच सांगत नाही. सुखी माणूस निर्ल्लजपणे सदरा न घालता हिंडत होता असा याचा अर्थ आहे. तेव्हा निर्ल्लज बना. निलाजरेपणा, निर्ल्लजपणा आणि कोडगेपणा या पायऱ्या हळूहळू ओलांडायला शिका. 'कोडगे कुत्रे जेवायला उठले' असे म्हणतात. याचा अर्थ कोडग्यास कधॊच भुकेले राहावे लागत नाही हा आहे. 'निलाजरेपणा पोटी फळे रसाळ गोमटी' हा खरा अभंग आहे पण आपल्या धुरीणांनी तो स्वत:साठी ठेऊन त्याचे शब्द बदलले. त्यामुळेच समाजातील पुढारी या गुणाचे संवर्धन करून अजून पुढे जाताना दिसतात. या जगात आलो आपण चार दिवसांसाठी ते या लाज लज्जा शरमेपायी वाया घालवू नका. गेंड्याची कातडी कमवा. कमवा म्हणजे मेहनत आलीच. त्यासाठी आपल्या मनाची समजूत काढा. गेंड्याची कातडी दिसायला छान नसली तरी उपयुक्त असते. बाह्य सौंदर्यावर जाऊ नका. उपयुक्तता महत्त्वाचीच. दिसण्यापेक्षा असणे महत्त्वाचे.

**<u>संगीताची उपासना करा.</u>**

रोम जळत असताना नीरो फिडल वाजवीत होता. अशी एकाग्रता साधा. आग विझविणे फायर ब्रिगेडचे काम असताना त्यात ढवळाढवळ न करून नीरोने आदर्श घालून दिला आहे त्याचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवा. फिडल ही भानगड काय, ती कुठे मिळते आणि फिडलचे क्लासेस कुठे चालतात याची चौकशी आजच करा.

**व्यायाम करा**

व्यायामाने शरीर लवचिक राहाते. त्यामुळे वारा फिरेल तशी पटकन पाठ फिरविता येते. त्यासाठी फीट राहा. मोठ्यांसमोर नम्र व्हा. वाकावयास लाजू नका. वाकताना आपला इगो मध्ये मध्ये आणू नका. सर्व एकाच इश्वराची लेकरे असताना समोरचा साहेब किंवा आपल्या पक्षातील नेता आपल्याहून लहान आहे म्हणून वाकायचे सोडू नका. गरज भासल्यास त्यांचे जोडे उचला. कोणतेही काम हलके नसते हे समजून घ्या.

**उधार घ्यावयास लाजू नका.**

आपल्याकडे काही कमी असल्यास दुसऱ्याकडून घ्यावे हे लक्षात ठेवा. लहानपणी शाळेतील शिक्षक आपल्याला त्यांच्याकडची विद्या देतात तेव्हा आपण लाजत नाही तर इतरांकडील पैसाअडका आपण घेताना का लाजावे? सर्व सृष्टी माया आहे. आणि नाशवंत आहे. यात आपपरभाव नको. तेव्हा गरज असल्यास मागून घ्या. घेतलेल्या गोष्टी परत देऊन देणाऱ्याचा अपमान करू नका. मोठ्या मनाने तो देतो त्याचे मन मोडू नका. पैसाअडका कोणी छातीवर बांधून नेत नाहीत हे मनावर बिंबवा.

**गॉसिप ? नव्हे, हे तर हृदयाचे टॉनिक**

पूर्वी यास चुगली किंवा चहाडी म्हणत. आज गॉसिप म्हणतात. गॉसिप मुळे आपले मन साफ होण्यास मदत होते. मन साफ राहाणे आरोग्यासाठी हितकर आहे. शेवटी आरोग्यं धनसंपदा म्हटलंच आहे. कोणा मागे काही बोलायची इच्छा झाल्यास मनात दाबून ठेवू नका. त्यामुळे मनावर अनावश्यक ताण पडतो. त्यापेक्षा बोलून मोकळे व्हा. फक्त ज्याच्या किंवा जिच्या बद्दल बोलायचे ती व्यकी जवळपास नाही याची खात्री करा. आज तुम्ही नाही बोललात तर उद्या कोणीतरी बोलेलच यामुळे आपले मन साफ करून घ्या. आपल्या घरीही तशाच गोष्टी घडत असतील तरीही जराही अनमान न करता इतरांना शेजाऱ्यांच्या किंवा आपल्या सहकाऱ्यांच्या चविष्ट गोष्टी सांगा. एखाद्या दिवशी त्या तशा चविष्ट नसतील तर आपल्या कल्पनेप्रमाणे सांगायला लाजू नका. कल्पना शक्ती देवाने फक्त मानवासच दिली आहे, तिचा नीट वापर करणे गरजेचे आहे.

याव्यतिरिक्त काही गोष्टी आहेत. जसे चुकांना माफ करा. Forgive and Forget म्हणतात. त्याप्रमाणे आपल्या स्वत:च्या चुकांना मोठ्या मनाने माफ करा. हे जग सुखी करून जाईन असे म्हणताना इतरांबद्दल आपण काहीच करू शकत नसाल तर निदान

स्वत:तरी सुखी व्हा. उद्या प्रत्येक जण स्वत: सुखी होऊ लागला तर संपूर्ण जग सुखी होण्यास वेळ लागणार नाही. भूतकाळ विसरून वर्तमानात जगा. आपल्या जुन्या दिवसातील घोडचुका आठवू नका. इतरेजनांस मात्र त्यांच्याच भल्या साठी त्यांच्या चुकांची जाणीव करून द्या म्हणजे त्यांना सुधारण्याची संधी मिळेल. नेहमी इतरांचे भले चिंतण्याने आपले हृदय साफ राहाते.

क्रिकेट खेळत असाल तर प्रॅक्टिस म्हणून फुटबॉल खेळून प्रॅक्टिस मधेच जखमी होऊ नका. खरे तर प्रत्यक्ष मॅच पर्यंत काही खेळूच नका कारण कोठलेतरी हाड तुटू शकते आणि तुमची खेळायची संधी हुकू शकते.

आम्ही हे सर्व न घाबरता सांगत आहोत. आजपर्यंत कोणीही हे असे सांगितले नाही. पण तरीही आपल्यातील कित्येक स्वत:च्या व्यावहारिक शहाणपणातून असे वागत आले आहेत. आपण हे वाचून स्वत:चा फायदा करून घ्या. फक्त हे सर्व इतरांना सहजपणे वाचावयास न मिळेल असे पहा. स्पर्धा नको.

आमचे काय? शेवटी 'सर्वेन सुखिनं संतु' हीच इच्छा आणि काय?

३.

## एकविसाव्या शतकातील मूर्खांची लक्षणे

काही शतकांपूर्वीची गोष्ट. ठोसरांच्या घरी मुलाच्या लग्नाची धामधूम होती. नारायणाने शेवटच्या क्षणापर्यंत वाट पाहिली. आणि बोहोल्यावरून धूम ठोकली. लग्नघरी हलकल्लोळ माजला. लग्नमंडपातून पळून लग्न न करता नारायणाने आपले शहाणपण पटवून दिले आणि पुढे रामदासस्वामी बनून जगाला मूर्खांची लक्षणे सांगितली.

तो काळच वेगळा होता. जमाना अलग होता. प्रत्यक्ष शिवाजीराजांचे राज्य होते. इमानदारी लोकांच्या नसानसातून वाहत होती. राजा तेव्हा उपभोगशून्य स्वामी होता. काळ बदलला. राजे आता उपयोगशून्य स्वामी होऊ लागले. प्रजाही बदलली. या सर्वांत मूर्खपणात ही बदल झाला. कालचे शहाणे आज मूर्खांत गणले जाऊ लागले. काळाचा महिमा आणि काय? बदललेल्या काळात मूर्खांची लक्षणे ही बदलली.

**इमानदारी**

न बदले स्वामी
ठेवी इमान निश्चल
जाणावे तयास तो येक मूर्ख

व्यापार वाढला तशा सर्व गोष्टी बाजारात मिळू लागल्या. पैशांची ताकद वाढली. पैसा ही फेकण्याची गोष्ट झाली. पैसा तमाशा पाहण्याच्या उपयोगात येऊ लागला. माणूस प्रगत झाला तशी त्याची क्रयशक्ती वाढली. आणि विक्रयशक्ती ही वाढली. इमान ही विकायवयाची गोष्ट आहे याची जाणीव लोकांस झाली. ज्याची बोली ज्यास्त त्यास इमान विकणे होऊ लागले. पण तरी काही मूर्ख राहिलेच मागे. शिवाजी महाराजांच्या कुत्र्याचे उदाहरण देऊन इमानदारी अजूनही जपू पाहाणारे मूर्खच आहेत. बदल होतात त्या प्रमाणे आपण बदललो नाही तर नामशेष व्हायची पाळी येणारच.

**स्वामी निष्ठा**

धन्यास मानी जो आपला स्वामी
प्राण वाहिला त्याच्याच पाई
जाणावे तयास तो येक मूर्ख

पूर्वीच्या काळी स्वामीच असे होते की सेवक आपोआप निष्ठ होण्यात धन्यता मानत असे. आता ते स्वामीही नाहीत आणि सेवकही नाहीत. शिवाजीमहाराजांसारखे स्वामी असतील तर त्यांच्या साठी प्राण द्यायला त्यांचे श्वान ही तयार असतील. आज स्वामीचीच निष्टा आपल्या प्रजेवर नि सेवकांवर नसेल तर सेवक तरी त्याला अपवाद कसे राहाणार? मागे आपल्या धन्याचे नमक खाणारी मंडळी होती. आता बाजारात स्वत:च्या पैशाने टाटा सॉल्ट आणल्यावर खाल्ल्या मिठाची तरी काय तमा बाळगावी कोणी? आजच्या स्वामींनी फक्त शिवाजीमहाराजांसारखी मोठमोठी नावे घ्यावीत, महाराजांना देवाचा अवतार बनवावे, म्हणजे आपली प्रत्यक्ष देवाबरोबर बरोबरी करण्याची कोणी अपेक्षा ठेवणार नाही याची तजवीज करून ठेवावी. आणि सेवकांचे काय सांगावे? ते तर यांच्या दोन कदम पुढे. आज कॉर्पोरेट कल्चर अंगी बाणवावे. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी म्हणतात, जो ज्यास्त पोळया खाऊ घालील त्याची टाळी वाजवावी. एक स्वामी ब्रेड खाऊ घालत असेल आणि दुसरा त्यावर बटर ही लाऊन देत असेल तर दुसऱ्याची चाकरी पत्करावी, जोपर्यंत कोणी तिसरा मिळत नाही जो ब्रेड बटर बरोबर ज्याम ही खाऊ घालेल. थोडक्यात काय कोणाची तरी टाळी वाजवायचीच आहे तर ज्याच्या पोळया जास्त त्याच्या टाळया वाजवाव्यात. पूर्वी नोकरीला चिकटला की गोचीडासारखी ती पकडून ठेवीत आज फुलपाखरासारखे एका नोकरीवरून दुसरीवर उडतात. तरीही आज काही असे आहेत जे गेले ते दिन गेले म्हणून ही पूर्वीच्याच पद्धतीने आपल्या धन्याची सेवा करण्यात धन्यता मानतात. हे मूर्खांचेच अवतार मानले पाहिजेत.

**परोपकार**

सज्ज सदा परोपकार
न जाणती व्यवहार
जाणावे तयास तो येक मूर्ख

फार पूर्वी पु.ल.देशपांडे नावाचे एक लेखक होऊन गेले. त्यांनी ‘परोपकारी गंपू‘ नावाचा लेख लिहून परोपकाराचे स्मारक बनवून ठेवले आहे. यातून हवा तो बोध घ्यावा. तो असा की स्मारक गेलेल्याचेच बनते, परोपकारास शांती मिळो. तेव्हा परोपकाराची फॅशन आता गेली. दुसऱ्याचे भले करून त्यास आपल्या उपकाराच्या ओझ्याची जाणिव न होऊ देता ते करणे हे पूर्वी परम कर्त्यव्य असे. आज दुसऱ्यास मिंधे बनावे लागू नये असा उदात्त विचार करून मदतच न करणे हे भासवायचा जमाना आहे. तरीही हातून काही

उपकार घडलाच तर त्याचा पुरेपूर मोबदला घ्यायची पद्धत आहे. पूर्वी एका हाताचे दुसऱ्यास कळू नये म्हणत, आज एका बोटाने दिलेले दान दोन्ही हाताच्या दहाही बोटांना कळावे याची सोय होते. दुसऱ्यांस त्रास देताना मात्र जास्त विचार करू नये. आज सॉरी म्हटले की काम भागते. अशी सोयच आपल्या भाषाकारांनी करून ठेवली आहे. मोठमोठ्या कंपन्यातून एटिकेट्स महत्त्वाचे हे शिकविले जाते, आपल्या गिऱ्हाईकाचे काम करायला न शिकविता त्यास 'सॉरी सर' कसे म्हणावे याचेच प्रशिक्षण दिले जाते. परोपकार ही दुर्मिळ झालेली चीज असून त्या शब्दासच शब्द कोशातून काढून टाकण्याची आवशक्यता आहे. असे असताना काही महाभाग आजही पदराला खार लावून इतरांस मदत करायला धावतात. ही मूर्खपणाची कमालच झाली.

**साधी रहाणी उच्च विचारसरणी**

राहाणी ही साधी अन<br>करे विचार उदात्त<br>जाणावे तयास तो येक मूर्ख

स्वत: रामदास स्वामी कासेच्या लंगोटीवर फिरले. आज तसे करू गेल्यास रवानगी तुरूंगात व्हायची.

आज जमाना पॅकेजिंगचा आहे. पॅकेजिंग महत्त्वाचे. आतील माल इतका महत्त्वाचा नाही. कव्हर असे असावे की बघताच खूश व्हावे. स्वत: विनातिकीट असाल, तिकीट परवडत नसेल तरी चालेल पण कपडे असे घाला की फर्स्ट काय एसी क्लास मधल्या टीसीलाही तिकीट विचारताना विचार करायला लागावा. एकनूर आदमी दसनूर कपडा पूर्वीही म्हणत, आता आदमी शून्य नूर ही चालतो पण कपडा मात्र शंभर नूर असतो. 'कारे भुललासि वरलिया रंगा' वगैरे म्हणण्याचे दिवस खूप मागे पडले. उत्क्रांतीच्या या टप्प्यात हे सर्व व्हायचेच. विचारीपणाची विचारसरणी कधीच मागे पडली. विचारसरणी वगैरे शब्द आता वापरणे ही ऑकवर्ड वाटायला लागले आहे. उच्च विचार या शब्दातील उंची आता फक्त शहरातील उंच इमारतींना लागू पडते. उच्च विचारसरणी आणि त्या श्रेणीतील माणसे आता नामशेष व्हायला आली. उच्च काय नि नीच काय विचार करणे हेच मागासलेपणाचे लक्षण झाले आहे. आजची किंवा खरे तर कालची समाजवादी मंडळी यात मोडतात. मोठे मोठे उद्योगपती आपली संपत्ती साठवून ठेवतात आणि सरकारकडे आपल्या उद्योग धंद्यासाठी मदतीची याचना करतात. त्यांच्या मोठमोठ्या गाड्या, हेलिकॉप्टरे आणि उंची कपडेलत्ते

आणि राहणी पाहून सरकार दरबार नमून राहातो. उच्च राहाणी आणि साधी विचारसरणी मुळे अशा लोकांना सरकार दरबारी मोठा सन्मान मिळतो. तेव्हा अशा चालीने चालणाराच खरा शहाणा अन्यथा समाजवाद्यांसारखे नामशेष होणे नशिबी लिहीले जाईल हे नक्की.

**सत्यवचनी**

सदैव स्वमुखी सत्यवचन
दिल्या वचनास राही चिटकोन
जाणावे तयास तो येक मूर्ख

हरीश्चंद्राचा अवतार हा डायनोसॉरच्या जमान्यातला. त्या दृष्टीने ते समकालीन. 'सत्यवचन' आणि 'मेरा वचन गीता की कसम' चे दिवस गेले. असत्यास प्रतिष्ठा मिळू लागली. दिल्या शब्दास जागणे ही पद्धत आता नाही. प्रत्येक शब्दास जागत राहाल तर नाहक जागरण घडेल. आणि जागरणाने तब्येत बिघडून हॉस्पिटलची बिले वाढतील. सदा सत्य वचनाने फक्त अनारोग्यसच निमंत्रण मिळते.

**सदाचारी**

समजती सदाचार अति भारी
स्वत:स करती सदा सदाचारी
जाणावे तयास तो येक मूर्ख

'सदाचारी सदा भिकारी' असा व्यवहारात न वापरला जाणारा पण अत्यंत व्यवहारी असा वाक्प्रचार आहे. काही वर्षांपूर्वी सदाचारी करावे सकल जन म्हणू आई बाप धडपडत. याची सुरूवात 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' ने होई. पुढे मग 'सुसंगति सदा घडो' आणि 'लवकर निजे लवकर उठे तया ज्ञान आरोग्य' भेटे असे काही बाही मुलांस शिकविले जाई. पोरांना सदाचारी होण्यावाचून पर्याय नसे. मुले करणार तरी काय? अभ्यास आणि खेळ याव्यतिरिक्त करण्यासारखे काही नव्हते. तेव्हा लवकर निजणे ठरलेले. सुसंगति घडायला सगळेच सदाचारी. आज कोण लवकर निजेल? टीव्ही नि कॉम्प्युटर गेम्स मध्ये अभ्यासास वेळ नाही तेव्हा लवकर निजण्याची गोष्ट सुचेलच कोणाला? आणि उशीरा उठून कोणी पडलाच आजारी तर हॉस्पिटले आहेतच पहायला. तरी देखील दिसतात कोठे कोठे लोक. सदाचारी म्हणवून घेणारे. यांना काळाची पावले ओळखता येत नाहीत, वागतात शहाण्यासारखी. ही स्वत: नॉन करप्ट असतात, लोकांची कामे करतात, प्रामाणिकपणा

यांच्या अंगात बाणलेला असतो. यांच्या या मूर्खपणाच्या सुरस आणि चमत्कारिक कथा सर्वत्र ऐकावयास मिळतात.

**वक्तशीरपणा**

जाणितो स्वत:स
घड्याळी गुलाम
जाणावे तयास तो येक मूर्ख

मुळात ही वक्त वक्त की बात है. माणूस जन्मतो तो काय घड्याळ पाहून? घड्याळ माणसासाठी आहे, माणूस घड्याळासाठी नाही. तेव्हा त्या निर्जीव काट्यांची गुलामगिरी किती करणार? हा विचार आज महत्त्वाचा. वेळास पैशांप्रमाणे किंमत देऊन हिशेबीपणा करण्याचे दिवस गेले. आता हिशेब फक्त नोटांचे होतात. वेळे सारख्या चिल्लर गोष्टींचे नाहीत.

**सद्सदविवेक**

सद्सदविवेकास
मन केले ग्वाही
जाणावे तयास तो येक मूर्ख

या जडजंबाळ शब्दाचे पूर्वी कोण कौतुक होई. नीरक्षीर विवेक काय नि सतअसत चे भान काय. हे सर्व आज आऊटडेटेड झाले आहे. सत्याअसत्याशी मन केले ग्वाही बदलून आज नफा फायद्याशी मन केले ग्वाही मानियले नाही जनमत हा आजचा मंत्र आहे. आपल्या फायद्यासाठी चांगले काय हाच खरा मुद्दा आहे. एखाद्या गोष्टीचा चांगलेवाईटपणा नैतिकतेवर ठरवणे कालबाह्य आहे. जो असे अजूनही करीत असेल तो मूर्खच समजला पाहिजे.

'शहाणपण देगा देवा' म्हणताना शहाणपणाच्या व्याख्या बदलल्या आहेत, आहेत त्या कालसापेक्ष असतात हे लक्षात ठेवलेले बरे. नाही तर मागायचे एक आणि मिळायचे भलतेच ! देव ही तथास्तु म्हणेल तेव्हा त्याच्याकडे मागणे काय याबद्दल मनात क्लियर असणे महत्त्वाचे.

४

## पुतळयांच्या देशा

महानपुर नावाचा एक देश होता. नावातच महानता असल्याने तिथे महान व्यक्तींची कमतरता तिथे नव्हती. काही वर्षांपूर्वी तर तिथे एक आड एक माणूस महान होता. पुढे लोकसंख्या वाढल्यावर हे प्रमाण घटले पण अजून ही तो महान प्रदेश त्याच नावाने ओळखला जातो. पुढे त्या देशात महान व्यक्तींचे पुतळे बनवण्याची प्रथा पडली. महान असल्याचा नुसता संशय जरी आला तरी ती व्यक्ती जाताच तिचा पुतळा उभारला जाऊ लागला. त्यामुळे त्या देशात शिल्पकारांना चांगले दिवस आले. कधी कधी तर एखादी मोठॉ व्यक्ती गंभीर आजारी पडली तर आजकाल पेपराचे संपादक जसे आगाऊ अग्रलेख लिहून तयार ठेवतात तशी पुतळयाची ऑर्डर तयार ठेवली जायची. हा देश पुढे पुतळयांचा देश म्हणून ओळखला जाऊ लागला. 'सुंदर देशा पवित्र देशा पुतळयांच्या देशा' असे तिथले एक गीत प्रसिद्ध होते.

पुतळे पण किती वेगवेगळे असावेत. काही छातीपर्यंतचे तर काही पूर्ण. काही उभ्या तले तर काही बसलेले. कदाचित कोणाचा पुतळा झोपलेला बनू शकला असता पण त्याला लागणारी जागा त्या देशात कमी होती. लेखकाचा पुतळा असेल तर तो मान मोडून लिहिताना दिसे, एखाद्या कवीच्या पुतळा असेल तर तो अर्धे तोंड उघडून हात वर करून कविता वाचनाचा हावभाव आणताना दिसे. शेंदाड शिपायाच्या पुतळयाच्या हातात बंदूक नाही तर तलवार दिसे. तर एखादा विचारवंत पुतळयात जाऊन बसला तरी त्याच्या गालावर दोन तीन बोटे ठेऊन गंभीरपणे बसलेला असे. पुढाऱ्यांचा पुतळा हात वर करुन लोकांना आवाहन करतानाचा असे. माणूस जाताच त्याचा पुतळा उभारला जाई. लोक त्याला नमस्कार वगैरे करीत. हारतुरे होत. लोक घरोघरी परतत. मग ते पुतळे कावळे आणि कबुतरांच्या मालकीत येत. ते त्यांची व्यवस्थित काळजी घेत. पुतळयांमुळे पक्ष्यांची संख्या त्या देशात खूप होती. कावळॆ, कबुतरे आणि चिमण्यांना तोटा नव्हता. त्यामुळे पर्यावरणाची पण काळजी घेतली जात होती. पुतळयाच्या पहिल्या वाढदिवशी त्याला अंघोळ घालून परत हारतुरे होत. त्यानंतर तो पुतळा 'उरलो पुतळया पुरता' म्हणून उभा असे. थोडक्यात त्या देशात शिल्पकार आणि पक्षी हे खूष होते.

पुतळयांचा मुख्य उपयोग नंतर मात्र त्याची बदनामी करायला होत असे. म्हणजे गोरा पुतळा असेल तर तर त्याला काळे फासले जाई आणि काळा असेल तर त्यावर थोडा कचरा किंवा चप्पल फेकली की झाले. मग ज्या कोणाला तो पुतळा जवळचा वाटेल त्यांच्या भावना दुखावत. अस्मिता दुखावली जाई. थोडीफार लुटालूट होई, दोन चार मुडदे पडत. पडलेल्या मुडद्यात कोणी महान व्यक्ती असेल तर त्याचा पुन्हा पुतळा होई. थोडक्यात कोणाला कोणाची कुरापत काढायची असेल तर पुतळे उपयोगी पडत. किंबहुना त्यासाठीच तिथल्या सरकारने ही सोय उपलब्ध करून दिली होती असे म्हणता येईल.

त्या राज्यात भावना आणि अस्मिता या बहिणी राहात होत्या. त्यांचा संचार सगळीकडे असायचा. त्या दोन्ही अत्यंत नाजूक. चालता चालता त्यांना चटकन ठेच लागायची. त्या एकमेकांवर एवढ्या अवलंबून असायच्या की एक दुखावली की लगेच दुसरीच्या डोळयात पाणी येई. जणू काही जुळया बहिणीच. त्यात ही अस्मिता ही मोठी, भावना लहान पण तरीही भावना दुखावली की अस्मिता रडू लागलीच समजा. देशात पुढे फार कठीण परिस्थिती आली. दर दिवशी काही ना काही कारणानी भावना आणि अस्मिता दुखावू लागल्या. इतके की त्यांची प्रकृती अगदी तोळामासा झाली. दोघी आलटून पालटून आय.सी.यू. त भरती होऊ लागल्या. त्यांत पुतळयांची विटंबना हे मुख्य कारण ठरू लागले. सरकारला त्याची दखल घ्यावीच लागली. सरकारने भावना आणि सुव्यवस्था नीट रहावी म्हणून एक अस्मिता खाते तयार करून त्यावर एक स्वतंत्र मंत्री नेमला.

नव्या खात्याच्या नव्या मंत्री महोदयांनी पहिला निर्णय घेतला तो सर्व पुतळे एका ठिकाणी हलवायचा. सर्व पुतळे हलवणे वाटते तेवढे सोपे नव्हते. सर्वात मोठा प्रश्न जागेचा. ती मिळवतानाच भावना आणि अस्मिता अजून दुखावतात काय असा प्रश्न सगळयांना पडला. शेवटी मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने प्रश्न सुटला एकदाचा. एवढे सारे पुतळे हलवणे मोठे जिकीरीचे काम. त्यात कोणाचा हात तुटला किंवा हातातली तलवार तुटली किंवा एखाद्या पुढाऱ्याचे आकाशाकडे रोखलेले बोट तुटले तर परत भावना आणि अस्मिता पोहोचायच्या आय.सी.यु.त. पुतळा पार्कात जागा कमी पडली तर पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यांवर काही पुतळे मांडण्याची व्यवस्था झाली. शाळेत हजेरी घ्यावी त्याप्रमाणे 'अ' पासून सुरू करून बाराखडी च्या अक्षरांक्रमाने पुतळे मांडण्यात आले. नाहीतर पहिला कोण यावर हातघाईची शक्यता होती. त्यात राष्ट्रपिता महात्मा गांधींचा नंबर बराच मागे गेला. तर त्यावेळचे एक ( डॉन कम ) प्रसिद्ध पुढारी कै.अमरानंद अडथळे यांचा पुतळा त्यांच्या आद्याक्षरांमुळे पहिला आला. पुतळयांना माळ घालता यावी म्हणून स्वयंचलित शिडी चीन

देशातून मागवण्यात आली. ज्यांना हवे ते भाडे भरून ती वापरू शकत होते. पुतळा पार्क झाल्यावर पक्ष्यांना पण स्थलांतरीत व्हावे लागले. कावळे नि कबूतरे सर्व एकाच बागेत गुण्यागोविंदाने राहू लागली.

पण एक मात्र झाले. पुतळयाची विटंबना असो की पूजा तिकडील पहारेकरी कोणालाच हात ओले केल्या शिवाय सोडेनासा झाला. विटंबनेसारख्या बेकायदेशीर कामासाठी हारतुर्‍यांपेक्षा दुप्पट चिरीमिरी द्यावी लागू लागली. नुसते काळे फासणे ही खार्चिक झाल्याने लोकांनी तो नाद सोडला. पुढे पुतळे पार्क फक्त एक उद्यान म्हणून राहिले. पालिकेने पावसाळयातील चार महिने पुतळे धुतले जातील असे जाहीर करून त्या पुतळयांविषयी आस्था व्यक्त केली. पुढे पुतळयांची उपयुक्तता संपल्याने पुतळे बनणेच बंद पडले. जुने पुतळे अजून ही तिथेच आहेत.

५

## विचारवंताचा 'वामना'वतार

वामन हरी जोशी विचारवंत होईलसे वाटले नव्हते. नाही म्हणजे लहानपणी आम्ही एकत्रच वाढलो पण त्यात असे काही गुण दिसले नव्हते. आम्ही सारखेच मस्तीखोर होतो. शाळा सुटली, मी कॉमर्सला गेलो नि तो आर्ट्सला. आणि पुढे काय झाले कोणास ठाऊक. हल्ली खूप वर्षांनी वामन पुण्यात भेटला. पूर्वीचा वामन्या खूपच वेगळा होता आतापेक्षा. तो एवढा गंभीर झालेला मी कधी पाहिला नव्हता. वामन भेटला नि मला खूपच आनंद झाला. इकडतिकडच्या गप्पा झाल्या. लहानपणच्या आठवणी जाग्या झाल्या. त्याला म्हटले,

'वामन बाळपणीचा काळ सुखाचा नाही?'

यावर त्याने काय म्हणावे?

'अनंता, अरे एक तरी लहान मूल दाखव असे म्हणणारे. लहानपण देगा देवा वगैरे मोठेपणी. एकतर कोणी लहान मुलगा स्वत:ला लहान समजत नाही. आणि प्रत्येक मुलाला मोठेच व्हायचे असते. आणि गणपुले गुरूजी आणि घोसाळकर बाईंच्या शिक्षा आठवल्या तर कसले लहानपण देगा देवा?'

त्याचे हे म्हणणे तसे खरेच होते. ओणवे उभे रहा, मैदानाला फेऱ्या मारा, उठाबशा काढा अशा कितीतरी सजा आम्ही एकत्र भोगल्या होत्या.

'नाही रे, तरीपण...'

मला मध्येच थांबवत तो म्हणाला, 'अरे हीच माझी थियरी ऑफ रिलेटिव्हिटी २ आहे. आज पेक्षा आपण काल सुखी असतो. आणि काल पेक्षा परवा. सगळे काही सापेक्ष. तसे पण आज काल मुलांना बालपण असतेच कुठे. आजकाल फक्त चाईल्डहूड"

मी प्रश्नार्थक नजरेने पाहतोय याकडे दुर्लक्ष करीत तो पुढे बोलतच राहिला,

"चाईल्डहूड बद्दल मी एक थियरी मांडली आहे. म्हणजे या शब्दाच्या व्युत्पत्ती बद्दल. यातला हूड शब्द मराठीतून गेला आहे. काय आहे २८ सप्टेंबर१८८९ रोजी एक लॉर्ड हेडींग म्हणून गोरा साहेब रावबहादूर कसबेंच्या घरी आला. संध्याकाळची ४.३५ ची वेळ. रावबहादुरांचा ४ वर्ष १२५ दिवस वयाचा मुलगा समोरच अंगठा चोखत बसला होता. गेली

कित्येक वर्ष तो उजवा अंगठा चोखत होता असे मानले जात होते पण मी सप्रमाण सिद्ध केले की त्यावेळी तो डावा अंगठाच चोखत होता. मुद्दा तो नाही. तर त्याला हेडींगने विचारले,

'what is your name, तुझा नाम काय?'

प्रथम तो काहीच बोलला नाही. साहेबाने परत विचारले. त्यावर त्याने आपली तपस्या भंग झाल्यासारखा चेहरा करीत त्याला जीभ दाखवली. रावबहादूराला टेंशन. रावबहादुरकी जाते की काय? ओशाळवाणे हसत तो म्हणाला,

'small child your majesty. जरा हूड आहे.' हेडींग त्यावर म्हणाला

'yes, yes, child hood, child hood.'

बघ ना आपण यंगहूड किंवा ओल्डहूड कुठे म्हणतो. नंतर तो शब्द इंग्रजीत रूढ झाला. तर हे थोडे विषयांतर झाले. पण बघ ना ऑफिसात एखादा खडूस बॉस असतो. तो कधी एकदा रिटायर होईल अशी वाट आपण पाहतो. तो जातो आणि नवा कोणी येतो आणि पहिला बरा म्हणायची पाळी येते. खरं की नाही? सगळं काही रिलेटीव्ह आहे.' "

'तुला सांगतो माझी अजून एक थियरी आहे. थियरी ऑफ रिलेटीव्हिटी ३.' वामन गंभीर पणे म्हणाला.

'काय आहे बघ एखादी चूक बाहेरच्या कोणी माणसानी केली की ती मोठी वाटते तीच स्वत; किंवा आपल्या जवळच्या कोणी केली की लहान वाटते. आपल्या रिलेटीव्हसची चूक आपण झाकून ठेवतो.'

'म्हणजे आपला तो बाब्या किंवा दुसऱ्याच्या डोळयातील कुसळ दिसते असे आपण म्हणतो तोच हा प्रकार', मी म्हणालो.

माझ्याकडे अतिगंभीरपणे पहात वामन म्हणाला,

'होय तुम्हा सर्वसामान्यांना या भाषेत असे सांगता येईल. तर ही थियरी...'

मला सर्वसामान्य म्हणाल्याकडे दुर्लक्ष करीत मी विचारले,

'पण तू थियरी २ आणि ३ बद्दल म्हणालास, थियरी १ बद्दल काहीच नाही बोललास ते?'

'अरे ती आईन्स्टाईनची, त्यानंतर ह्या माझ्या २. आमच्यासारख्यांना समाजाला दिशा दाखवावी लागते ना.'

मी वामनकडे परत नीट पाहिले. आमच्यासारख्या म्हणजे कोणासारख्या मला कळले नाही. तरीपण त्याला थियरींच्या थरांतून बाहेर काढावे म्हणून मी म्हटले,

'काय घरच्या फ्रंटवर काय खबरबात?'

तसा तो म्हणाला, 'फ्रंट, अगदी करेक्ट. फ्रंटच. लढाईत सैनिक लढतात तसेच हे फ्रंट. बायको, मुले आणि नातेवाईक. त्यात ते तऱ्हेवाईक असले की आणखीनच कठीण. सगळयांच्या गरजांसाठी आपण धडपडतो. लढाई चालू. yes, front is the correct word.'

एवढ्या वर्षांत वामनचे इंग्रजी सुधारले असावे.

'तुला अजून एक गंमत सांगतो', वामन गंभीर पणे गंमत सांगत होता. मला त्याच्या गंमतीचीच गंमत वाटली.

"खूप वर्षांपूर्वी आपल्याकडे बायका नवऱ्याला परमेश्वर मानायच्या. नंतर काहीकाळ त्यांना तो माणूस वाटायला लागला. पुढे उत्क्रांतीच्या पुढच्या टप्प्यात त्यांना तो बैल किंवा बैलोबा वाटायला लागला. सगळ्या बायकांना आपला नवरा अगदी १०० टक्के बैलोबा आहे अशी खात्री असते. फक्त फरक एवढाच, पोळयाच्या दिवशी तरी बैलांची पूजा होते.'

त्याच्या म्हणण्यात न पटण्यासारखे काहीच नव्हते.

'अजून सांगू? फार पूर्वी म्हणायचे की ठेविले अनंते तैसेचि रहावे. आज सांगू अगदी तुझ्यासरख्या अनंत नावाच्या माणसांची बायको पण ते मानत नसेल. आहे की नाही गंमत.'

वामन च्या गंभीर चेहऱ्यावर गंमत शब्द शोभत नव्हता. मला माझ्या घरची स्थिती डोळयासमोर आली. पूर्वी ब्लॅक आणि व्हाईट टीव्ही होता तो बदलून कलर टी.व्ही. साठी आणि आता तो सुद्धा बदलून भिंतीवर कॅलेंडरप्रमाणे लटकणाऱ्या टीव्ही साठीचा हट्ट आला. कपडे काय, फ्रीज काय आणि वॉशींग मशीन काय सगळयांसाठी हाच हट्ट. वामनचे म्हणणे खरेच होते.

त्याची गाडी नॉर्मलवर आणावी म्हणून मी म्हणालो,

'मग वहिनी काय करतात? आणि मुलं?'

'तुला सांगू अनंता, मी लग्नच नाही केले.'

'मग हे सगळे?'

'अरे हे समाजशास्त्रीय अवलोकन आहे रे. आमच्यासारख्यांना समाजाला मार्गदर्शन करावेच लागते ना?'

वामन परत आमच्यासारख्यांना म्हणाला. म्हणजे कोणासारख्या मला काही कळेना. तेव्हढ्यात वामनच म्हणाला,

'बाकी शाळेचे दिवस मजेचे होते नाही?'

एव्हढ्या वेळात पहिल्यांदा त्याने गंभीरपणाचे बेअरिंग सोडले पण त्याचा चेहरा मात्र हिटविकेट झालेल्या बॅट्समन सारखा झाला होता. लगेच स्वत:ला सावरत तो म्हणाला,

'गेले ते दिन गेले. Times have changed अनंता.'

एवढा वेळ आम्ही भर रस्त्यात उभे होतो. त्याला मी म्हणालो,

'एकदा ये मुंबईला. भरपूर गप्पा मारू. सध्या आपल्या दोघांचा एक फोटो काढून ठेवतो.'

माझ्या मोबाईलचा कॅमेरा उलटा पकडत मी दोघांचा फोटो काढला. पाहिलं तर त्यात वामन गंभीर चेहर्‍यानी गालावर २ बोटे ठेऊन उभा. आता मला उलगडा झाला. वामन आणि विचारवंत झाला की काय? वामन मोठा होऊन विचारवंत होऊ शकतो असा विचारही शाळेत असताना कोणाच्याच मनात आला नसावा.

*****

आमच्या लहानपणी विचारवंतांचे फोटो पुस्तकात असायचे. एकजात सर्व गंभीर चेहर्‍याने गालावर १ किंवा २ किंवा ४ बोटे ठेऊन बसलेले असायचे. चेहर्‍यावर चिंता करतो विश्वाची असे भाव. त्यांनी गालावर १ का ४ बोटे ठेवावीत याचे काय निकष असतील कोणास ठाउक. कदाचित international चिंतक ४ बोटे तर local चिंतकांला १ बोट अलाउड असावे. कोणास ठाऊक पण त्या फोटो काढण्याच्या वेळी पण त्यांना गहन विचार करावा लागायचा हे मात्र खरे.

मी पण एकदा पाचही बोटे चेहेर्‍यावर ठेऊन फोटो काढला म्हटले १से भले दो, दो से भले ५. तर सर्व म्हणाले 'मनोजकुमारचे बेअरिंग छान घेतलंस तू !'

मग मी तो नादच सोडला.

६

## गणपती बाप्पा आणि मूषक सवांद

आज बाप्पाची शेवटची रात्र. उद्या सकाळी सारे विसर्जनाच्या तयारीस लागतील. गेले दहा दिवस कसे गेले याचा बाप्पा विचार करत होता. गेले दहा वर्ष नियमाने बाप्पा दहा दिवस कॅज्युअल लीव्ह टाकून येतो. म्हणजे यावेच लागते त्याला. एका छोट्या गल्लीतील मंडपात दरवर्षी बसायचे. नशिबाने आपला मंडप बाकी बाप्पांप्रमाणे बंद नसतो, कमीत कमी बाहेरचा उजेड तर पाहायला मिळतो म्हणून बाप्पास बरे वाटते. दरवर्षी येताना त्याला वाटायचे यावर्षी तर बंद मंडपात आपल्याला डांबणार नाहीत ना? अजून तरी तशी वेळ आली नाही म्हणून त्यास हायसे वाटे. कित्येक मोठे मोठे बाप्पा बिचारे दहा दिवस बंद मंडपात काढतात. साधा सूर्यप्रकाश दिसायची मारामार. दहा दिवसात नुसती दमछाक होते त्यांची. त्यामानाने आपली स्थिती चांगली म्हणून बाप्पाला नेहमी बरे वाटते. त्या मोठ्या बाप्पांसमोर अलोट गर्दी. त्यात परत आशीर्वादाच्या पोझ मध्ये चोवीस तास उभे राहायचे. मूषक सांगतो बाप्पाला कधी इकडील कथा, त्यात पृथ्वीवर लग्नाचा सोहळा असतो तेव्हा नवरा नवरीला असेच पाच सहा तास हात पुढे करून उभे राहावे लागते म्हणॆ. ते असेच थकून जातात. तसे सगळे बाप्पा दहा दिवसात दमून जातात. त्यातील काही पाच नाहीतर सात दिवसात परत जातील ते लवकर सुटतात. पण परत जायचे तर त्या मानवाच्या हाती. त्यात बाप्पाला कोण थोडीच विचारणार आहे? तरीपण ते थकणे भागणे पण परवडते, पण बाप्पाला त्या आशीर्वादाच्या पोझ मध्ये सर्वांना आशीर्वाद द्यावाच लागतो, कशाला म्हणून आपण आशीर्वाद देऊ नये याचा चॉईस नाही बाप्पाला. त्याचे पण वेगळे टेन्शन.

मूषकाची बाप्पाला आठवण झाली. तो मुटकुळे करून फुरंगटून बसलेला होता. बाप्पाला हसू आले. संध्याकाळीच मूषकाचे त्याच्याशी भांडण आले. तो त्याला स्वस्थ उभा राहू देईना तर बाप्पा रागावून त्याला म्हणाला, ’नीट उभा रहा मूषका, हलू नकोस इतका. स्वत:ला काय कॉम्प्युटरचा माऊस समजतोस की काय?’ मूषकाला राग आला. आपली त्या निर्जीव माऊसाशी तुलना व्हावी याचे त्याला वाईट वाटले. बाप्पाने त्या माऊसची तुलना

आपल्या सारख्या फ्युएल एफिशियंट वाहनाशी करावी? माऊस, फ्युएल, कॉम्प्युटर, पेट्रोल वगैरे मूषकानेच बाप्पाला दिलेले ज्ञान होते. वर्षातील तीनशे पंचावन्न दिवस मूषक पृथ्वीतलावर जाऊन येऊन असतो. पृथ्वीतलावर या वर्षी काय काय पाहावे नि ऎकावे लागेल याचा अंदाज तो बाप्पाला देत असतो. बाप्पावर त्याची माया खूप. तो चिडून बसलेला पाहून बाप्पा नेहमीची युक्ती करतो. आपल्या हाताने त्याला गुदगुल्या करतो. मूषक कसाबसा राग टिकवतो थोडावेळ, पण मग हसायला लागतोच.

'हे काय बाप्पा, धडपणे रागवूही देत नाहीस तू.' लटक्या रागाने मूषक म्हणतो. मूषकाचा राग हा असाच. बाप्पाने काहीतरी सांगून किंवा गुदगुल्या करून त्याला हसवले की त्याचे रागावणे संपते.

'झाली हौस पुरी बाप्पा?'

'माझी? म्हणजे तसे बरे वाटते. लोक कसे वेडॆ होतात माझ्या मागे ते बघायला. पण त्या मोठ मोठ्या बाप्पांइतके आम्ही काही लोकप्रिय नाही. कधी कधी तर आम्हाला आमच्या बाप्पापणाचीच शंका यायला लागते. आमच्यात काय कमी आहे की इकडचे लोकही उठून तिकडे रांगा लावतात?'

मूषक काही बोलत नाही. त्यालाही याचे उत्तर कुठे माहित आहे? सर्वज्ञानी बाप्पालाही कोड्यात टाकणाऱ्या दोन हाताच्या नि दोन पायाच्या मानवाबद्दल मात्र त्याला कुतुहल वाटायचे ते त्यामुळे. दहा दिवस बाप्पाबरोबर घालवायला मिळाल्याने त्यालाही बरे वाटते. छोट्या मंडपात राहिल्याने त्यालाही तसे बरे वाटते. त्याचे इतर मूषक बंधू बिचारे मोठ्या मोठ्या मंडपात दहा दिवसात दमून जातात. मोठ्या बाप्पांसमोरील मूषक विसर्जनानंतर हमखास आजारी पडतात. विषय बदलावा म्हणून मूषक म्हणतो,

'काय यावेळी मजा आली की नाही बाप्पा?'

'हो ना. ती नवीन गाणी बरी होती. पोरे छान नाचत होती. अगदी टी.व्ही. वरच्या कार्यक्रमात नाचतात तशी.'

'बाप्पा, जी.के. वाढलंय तुझे.'

'हट रे मूषका. समोरच्या त्या घरात दिसतो ना टी.व्ही. रोज ती छोटी पोरं नाचत असतात. आवाज येत नाही पण नाचतात कशी जोरात. आणि काय सुंदर भरजरी कपडे घालतात. तशीच मुले इथे पण नाचतात कार्यक्रमात.'

'असू दे. तू खूश झालास ना तर बस मग.'

'उद्या बाप्पा आपल्याला घरी जायचे.'

'होय मूषका. आपण तसे लकी बरे.'

'लकी? हा शब्द कुठे शिकलास तू?'

'तूच तर माझा गाईड आहेस की. लकी का? तर ते मोठमोठे बाप्पा आहेत ते समुद्रमार्गाने घरी पोहोचण्या आधीच किनाऱ्यावर परत लागतात. त्यापेक्षा आपण बरे की नाही?'

'पण त्यांचा इथला डामडौल तर पहा किती मोठा. तो कुठलासा बाप्पा आहे तो सोन्याच्या सिंहासनावर बसवतात म्हणे. त्याच्या अंगावर किती दागिनेच दागिने. लोक तेच बघायला येतात तिथे.'

'नको रे मूषका मला असा न्यूनगंड देऊस. आपण गरीबांचे बाप्पा बाबा.'

'पण एक सांगू बाप्पा, त्या श्रीमंत नि आपल्या साध्या बाप्पात एक गोष्ट सारखीच आहे.'

'नको सांगूस, सोपंय ते. भाव नि भक्ती दोन्हीकडे सारखीच.'

मूषक हसतो पण त्याला बाप्पाचे मन मोडवत नाही.

'काय रे हसतोस?'

'काही नाही बाप्पा, असेच.'

बाप्पाचे कान मोठे पण मंडपातील बोलणे ऐकत नाही तो. लोक काय काय मागतात नि हा इथे भक्तिभाव मागतोय. बोलूनचालून भोळ्या शंकराचा पुत्र हा. मूषकाने पृथ्वीवरील कितीतरी ऐकले नि पाहिले आहे ते बाप्पाला सांगायचा धीर त्याला होत नाही. ते दिसू नये म्हणून हे बाप्पाचे डोळे असेच छोटे असू देत. परत विषय बदलावा म्हणून तो म्हणाला,

'चल बाप्पा, जरा झोपूयात. दमला असाल. उद्या परत मिरवणूकीने जायचेय.'

बाप्पाही थकलेला. त्याचा डोळा लागला. मूषकही ते पाहून झोपी गेला.

अर्धवट झोपेत बाप्पाला कसला तरी आवाज आला. समोर त्याच्या एक भक्त उभा होता. अगदी पाया पडला. दंडवतच घातला. हात जोडून नमस्कार करीत होता. तो काय मागतोय ते काही बाप्पास कळेना. पण तो, 'बाप्पा काहीही माग तुला देईन पण माझे काम होऊ दे' एवढे बोललेला मात्र बाप्पाला कळले.

'मला अजून काही नको. फक्त तुझा भक्ती भाव दे.'

'भाव? बोला ना बाप्पा तुमचा भाव. काय देऊ? मोठा बिझिनेसमन मी. काही ही देईन. सोन्याचा उंदीर देऊ? पुढच्या वर्षी नवस फेडीन. तेवढे एक कामाचे बघा.'

'अरे, तुझा गैरसमज होतोय. मला हे असे काही नकोय. दे फक्त भक्ती. खरीखुरी.'

'हे काय बाप्पा. हे भक्ती भाव काय मागताय? जरा रिझनेबल काही मागा की. खरे तर मी त्या मोठ्या बाप्पाकडेच जाणार होतो पण या बिझिनेस मध्ये वेळच नाही झाला पहा. आता उद्या विसर्जन. त्या लाईनीत नंबर येणे कठीण. म्हणून तुझ्या पायी आलो बघ. हवे तर हिऱ्याचा मुकुट देतो. हिऱ्याच्या मुकुटाने तुझेही नाव होईल बघ. नवसाला पावतोस म्हणून फेमस झालास ना की मग असा उघड्या मंडपात राहणार नाहीस. मोठ्या बाप्पांसारखी गर्दी जमवशील. बघ, अशी संधी परत परत येत नाही. विचार कर बाप्पा. हिऱ्यांचा मुकुट फायनल बरंका.'

बाप्पालाच घाम फुटला. झोपेतून खडबडून बाप्पा जागा झाला. आपण ऐकलेले खरे की खोटे त्याला कळेना. मूषकाला विचारावे तर तो घोरत पडलेला.

बाप्पाला मूषकाबद्दल प्रेम दाटून आले. आजपर्यंत काही न मागता तो आपले वाहकाचे काम करतोय. मगाशी तो का हसला ते बाप्पाला आता समजले. प्रेमाने त्याने त्याच्या पाठीवर थोपटले आणि मूषक अजूनच गाढ झोपी गेला.

७

## दु:खहर्ता सुखकर्ता

'या वर्षीतरी मूषका आपण फिरायला जायचेच बरं.' गणराय त्यांच्या वाहक उंदरास म्हणाले.

'कशाला गणराया. इथे सर्व मस्त आहे. हा मंडप आहे, इतकी सुंदर सजावट आहे. कंटाळा येऊ नये म्हणून गाणी आहेत. खायला भरपूर मोदक आहेत. रस्त्यांवर काय पहायचे आता?'

'हे पहा तू नेशील की नाही सांग का तुला नुसता आळस आला आहे?'

'गणराया मी नेईन पण मध्येच सांगू नका परत चल म्हणून.'

'नाही, नाही म्हणणार.चल बाबा.'

मूषकाच्या पाठीवरून गणराय निघाले.

'चल रे जरा शांतपणे फेरफटका मारुन येऊ.'

'नीट बसा बाप्पा. रस्ते जरा खराब आहेत. सीट बेल्ट बांधा नाहीतर. आणि काळजी करू नका विसर्जनापर्यंत रस्ते ठीकठाक होतील सारे. पावसाळयात खराब झालेले रस्ते दुरूस्त व्हावेत म्हणून तर दूरदृष्टी दाखवून बळवंतरावांनी तुम्हाला दरवर्षी बोलवायचे ठरवले माहिती आहे ना बाप्पा तुम्हाला?'

'बरं बाबा चल आता. अरे हा एवढा अंधार कसला?'

'बाप्पा तो मंडप आहे बरं, तुम्हाला उघड्यावर टाकू नये म्हणून ही सोय. आणि उघड्यावरच्या बाप्पांपुढे एवढी गर्दी जमते का? तुम्ही म्हणजे मुंबईचे बाप्पा नं. वन'

'मूषका, काय इथे आमच्या आमच्यातच स्पर्धा सुरू झालीय काय?'

'अर्थात. तुम्ही इथले महाराजे, तो तिकडचा बाप्पा म्हणजे सम्राट आणि पलिकडे तिकडे राजा. अजून कुठे इकड तिकडचा बादशहा.'

'वा ! हे फारच छान. आम्ही महाराजच आहोत इथले.'

बाहेर 'वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ' कानावर पडते. मूषक हा हा करीत हसत सुटतो.

'काय रे मूषका हसतोस काय?'

'काय तुझी ही नावे रे गणराया. वक्रतुंड काय महाकाय आणि लंबोदर काय'

‘त्यात एवढे हसायसारखे काय आहे रे बाबा?‘

‘बाप्पा शुद्ध मराठीत याचा अनुवाद केला तर रागावाल तुम्ही, वाकडतोंड्या आणि ढेरपोट्या म्हटलं तर आवडेल तुम्हाला? आणि तुमच्या भक्तांच्या भावना दुखावतील त्या वेगळ्याच. बाकी संस्कृतात आणि आजकाल पृथ्वीवरच्या इंग्रजीत काहीही बोलले तर ते विद्वत्तापूर्ण वाटते बरं गणराया.

‘बरे ते जाऊ दे. पुढे चल आता.‘

‘अरे हा गोंगाट कसला?‘

‘काय हे बाप्पा इतक्यात विसरलात? ही इकडची भक्तीगीते आहेत. पहा किती भक्तीभावाने म्हणतायत, मुन्नी बदनाम हुई आणि चिकनी चमेली. पाहिलंत बाप्पा तुमच्या मुळे बदनाम मुन्नी पण भक्तीरसात न्हाऊन बदनाम झाली म्हणून किती आनंदात आहे. आणि बाप्पा याला तुम्ही गोंधळ म्हणता? अहो तुमच्या पुढच्या मंडपातील सांस्कृतिक कार्यक्रमांत ५-६ वर्षांच्या मुली अगदी हावभावांसह हे म्हणतात आणि त्यांचे आईबाप कृतार्थ होऊन पाहतात तुम्ही पाहिले नाहीत? बाप्पा लक्ष कुठे हो तुमचे? नुसते मोदकांकडे का?‘

मूषका तुझी जीभ फारच वळवळ करायला लागलीय.

‘बाप्पा काहीही बोलायला ही काय विधानसभा की लोकसभा वाटली तुम्हाला? तुम्ही हे विधान मागे घ्या नाहीतर मी संपावर जाईन. मग बघा परवडतंय का तुम्हाला पेट्रोल आणि डिझेल गाडीतून जायला यायला?‘

‘बरं सॉरी, सॉरी, मूषका रागावू नकोस. पण मोदकांवरून टोचलंस ना म्हणून जरा. चल बाबा चल लवकर.‘

‘अरे फारच गर्दी दिसते इथे? या लांबलचक लाईनी कसल्या?‘

‘तुमच्याच दर्शनाच्या बाप्पा. ही पहिली आहे ती साधी, इथे १२-१३ तास थांबल्यावर तुम्ही दर्शन देता, ती दुसरी आहे ती पैसे भरून येणाऱ्यांची. तिथे ३-४ तासांत तुम्ही भेटता आणि ती तिसरी आहे ती नवस फेडणाऱ्यांची.‘

‘नवस?‘

‘काय हे बाप्पा? तुम्ही स्वत:ला कोण समजता? मुंबईत तुम्ही फेमस काय तुमच्या ह्या उंचीमुळे आहात काय? नवसाला पावता म्हणून लोकं एवढ्या लांबलांबून येतात नाहीतर..‘

‘नाहीतर काय मूषका?‘

‘जाऊ दे बाप्पा. पाहिलेत का ते मगनशेठ? मागच्या वर्षी आले होते, त्यांची सारी बेकायदेशीर कामे कायदेशीर करून घ्यावी म्हणून नवस बोलले होते ते.‘

‘मग झाली सारी कामे तशी?‘

‘काय हे बाप्पा? तुम्हीच तर केलीत ना ती?‘

‘आम्ही?‘

‘मग बघा तरी त्यांच्या हातातला सोन्याचा मुकूट. तुमच्यासाठीच आणलाय खास. मजा आहे बाप्पा तुमची आणि त्यांच्या मागे पहा. त्या शालिनीताई घाटपांडे. मुलगी होऊ नये म्हणून नवस बोलल्या मागच्या वर्षी.‘

‘मग हे काम पण झाले?‘

‘बाप्पा अहो डॉक्टरांच्या मदतीने आणि तुमच्या आशीर्वादाने झाले की. आणि ती मुलं दिसताहेत ना ती फायनल इयरची आहेत. त्यांनी नवस बोलला होता पास व्हायसाठी. त्यांनी कॉपी केली आणि तुमच्या आशीर्वादाने ते पास ही झाले न पकडले जाता.‘

‘म्हणजे हे पण आम्हीच केले?‘

‘मग तुम्ही स्वत:ला समजता काय बाप्पा? तुम्हीच दु:खहर्ता आहात ना.‘

‘जाऊ दे. चल जरा लांब फिरून येऊ मूषका.‘

मूषक एका इमारतीसमोर थांबतो.

‘वा काय सुंदर आहे रे ही. किती मोठे मैदान!‘

बाप्पा ही शाळा आहे. तुम्ही विद्येचे दैवत म्हणून प्रथम येथे आलो.

‘छान, पाहिलंस किती छान इथले सरकार आहे. मुलांची किती काळजी.‘

काही न बोलता मूषक पुढे दुसऱ्या पडिक इमारती पुढे थांबतो.

‘अरे हे काय दाखवतोयस?‘

‘गणराया ह्या महापालिका शाळा आहेत. या सरकार चालवते गरीब मुलांसाठी.‘

आता काही न बोलण्याची पाळी बाप्पाची असते.

‘चल बाबा अजून पुढे.‘

‘अरे ते काय चालले आहे तिथे? तो कोण आहे रे मूषका?‘

‘बाप्पा तो ट्रॅफिक पोलिस.‘

‘अरे त्या माणसाने तो हिरवा कागद सरकवला बघ त्याच्या हातात.‘

‘काय बाप्पा आज पहिल्यांदाच येताय काय या पृथ्वीतलावर. त्याने सिग्नल तोडला असणार म्हणून तो त्यांची काहीतरी देवाणघेवाण सुरू आहे इतकंच.‘

‘असं काय? बरं चल पुढे.‘

‘अरे हे काय करताहेत सगळे मिळून?‘

‘पहाटेची वेळ झाली आहे गणराया. ती माणसे दिसताहेत ती पहा किती मेहनत करताहेत. त्यातील काही त्या दुधाच्या पिशव्यांतून दूध काढतायत आणि काही त्यात परत पाणी भरताहेत. हा इथला कुटीरोद्योग आहे बरंका गणराया.‘

‘मूषका, अरे ही तर भेसळ झाली.‘

‘बाप्पा मग काय झाले? हे दूध पिऊन तर इथली मुले मोठी होतायतच ना? आणि तुम्हाला भेसळीची सवय नाही ? तुमच्या समोरच्या एवढ्या गर्दीत शुद्ध भक्तीवाले किती आहेत? आहेत ते हौशे नवशे आणि गवसेच की.‘

‘पण यांना पापाची भीती नाही वाटत?‘

‘नाही, नाहीतरी तुम्ही कशासाठी आहात? दर वर्षी येताच ना इथे. एका नवसात सर्व पापे धुवून काढायची मग पुढच्या वर्षीसाठी नवीन अकाउंट. तुम्ही आहातच सुखकर्ता. सर्व पापे गिळूनच तर तुम्ही एवढे ढेरपोटे सॉरी लंबोदर झाला आहात ना?‘

‘मूषका मला वाटते परत आपल्या मंडपात जाऊन बसू.‘

‘पहा मी म्हटलेच होते तुम्ही लगेच परत फिराल म्हणून. चला जशी तुमची इच्छा गणराया.‘

‘आणि तू मला चुकीचे सांगितलेस या मंडपाबद्दल.‘

‘काय?‘

‘अरे हा बंद मंडप आम्हाला हे सारे दिसू नये म्हणून आहे आणि हे कर्कश आवाज आम्हाला ते ऐकू येऊ नये म्हणून आहेत बरे.‘

‘सॉरी बाप्पा पण मला वाटलं तुम्हाला हा धक्का सहन होईल वा नाही म्हणून सांगितले नव्हते. चला परत जाऊ.‘

८

## गणपत श्रीपती संवाद : एक श्रुतिका

पुरातन काळातील गोष्ट आहे . त्याकाळी रेडिओ नावाचा नुसताच बोलणारा टीव्ही होता. त्यावर चित्र दिसत नसे. नुसताच आवाज येई. सरकारी आकाशवाणी नावाचे त्यात चॅनेल असे. त्याला केंद्र म्हटले जाई. मायबाप सरकार त्या आकाशवाणीवरून आपली वाणी लोकांना ऐकवायचा प्रयत्न करीत असे. बाकी वेळात करमणूक करण्याचा प्रयत्न होई. त्या करिता त्याकाळी श्रुतिका नामक कलाप्रकार सादर होई. त्यात बहुतेकदा दोन पात्रेच बोलून मनोरंजन करीत असत. बहुधा त्यातूनही सरकारी कामाच्या जाहिरातीच सादर होत. त्यातही एखादा स्मार्ट लेखक बोलता बोलता सरकारी खाक्यावर आपल्या मतांची पिंक टाकून जाई. रेडिओवर ही सरकारी बाबूच बसत. त्यांच्या नजरेतून हे कधी कधी सुटणे अशक्य नव्हते. 'सब चलता है' हा आपला तेव्हा पासूनचा बाणा आहे. आज आपण वाचू ती तशीच एक पण या काळातील श्रुतिका. तिला आज टीआरपी नसल्याने ती रेडिओवर प्रत्यक्ष सादर होण्याची शक्यता नाही.

*****

गणपत : कायरे शिरपत, लई उशीर केलास यायला?

श्रीपती : आरे गणप्या, रस्त्यात खड्डे किती ते ठावं न्हाई का तुला?

गणपत : तर, तर, म्या उडत आलाय न्हवं पंख लाऊन. म्या पण त्याच रस्त्यातून आलतो. जरा लवकर निघावं घरसून. मंजे टायमावर आला असता माझ्या सारका.

श्रीपती : ते खरं तुझं पण माझी रिक्शा...

ग : तू कदी रिक्शा घेतली? माला बोल्ला न्हाईतो?

श्री : माजी न्हाई बाबा, मी ज्या रिक्शेत बासून येत व्हतो ती.

ग : असं सविस्तर बोल की गड्या.

श्री : त्या रिक्शेचं चाक खड्ड्यात रुतलं.

ग : इतिहास पुन्यांदा घडतो म्हनतात ते खरंच की रे भाऊ.

श्री : इतिहास ? त्याचा काय संबंद? तू काय सकाळी सकाळी?

ग : आरं, तसं न्हवं. म्हाभारतात पण अर्जुनाचे चाक आडकलं व्हतं.

श्री : अर्जुनाचं न्हवं

ग : मंग क्रूश्नाचे असेल.

श्री : न्हाई कर्णाच्या रथाचं चाल आडकलं व्हतं.

ग : तेच ते, क्रूश्न काय नि कर्ण काय दोनीबी एकच. तर त्यापरमाणे तुझंबी चाक आडकलं असा दाकला म्या देत होता.

श्री : तू काय बाबा ग्रेट हाये. पन खरंच झालं आसं की म्या येत होता त्या रिक्शेचं चाक खड्ड्यात आडकलं, नि ते भायेरच यीना झालं. मग माला ते उतरून भायेर ओडावं लागलं.

ग : माज्याकडे उशीरा येन्याची एकहजारेक कारनं हायत, हे नवीन एक हजार दोनवं कारन बरंका. ध्यानात ठिवतो मि बी.

श्री : बरं बाबा. तुजा इस्वास नसेल तर जाऊ दे. म्या अपला स्वारी बोलून मोकळा होतो. उशीर जाल्याबद्दल स्वारी, मग तर तुजं समाधान व्हईल का न्हाय?

ग : कारं शिरपत, खरं सांग, एवडे खड्डे हायेत रस्त्यात ?

श्री : मंग. आरं रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते ह्येच समजेना झालंय.

ग : माला काय वाट्टं शिरप्या, आपण पन यावर कायतरी उपाय शोदला पाह्यजे.

श्री : आरं आपन काय करनार ? तु काय स्वताला न्येता बिता समजतो काय?

ग : हे पा शिरपत, आपन ते लीडर लोक करतात त्येच करूया. पहिले खड्ड्यांची नीट पाहणी करूया. म्हंजे उपाय सुचंल. माजी मावशी म्हनायची, समश्या सुटायची आसल तर ती नीट समजून घ्यायला पायजे. गेली बिचारी आदल्या वर्षाला.

श्री : मग तु काय दरेक खड्डा पाहाणार की काय ?

ग : व्हय रे गड्या. आपन बी हवाई पाहणी करू खड्ड्यांची त्या नेत्यांवानी. तु येतो का न्हाई येवडं बोल.

श्री : कुटे? हवाई पाहणी ? तुझ्या इमानात? तु काय मोठा न्येता लागून गेला न्हवं.

ग : हाय मी मोठाच. माज्या कडे प्रावेट हेलिकॉप्टर हाये. चल खड्ड्यांची पाहाणी करू.

श्री : चल बाबा, तु म्हणतो तर न येऊन सांगतो कुणाला? पण ते तुजं हेलिकॉप्टर पडलं बिडलं तर?

ग : आरे शूर वीरा, रिक्शात बसायला घाबरत न्हाईस आनी इमानात बसतात घाबरतो? चल बिगी बिगी जाऊ.

श्री : चल, माला बी एकादा न्येता बनल्यावानी वाटून राह्यलंय.

मागे हेलिकॉप्टर उडाल्याचा जोरात आवाज. हळूहळू तो कमी होतो कारण गणपत आणि श्रीपत बोलायला लागतात.

श्री : काय वारं सुटलंय. हा पंखा बंद कर. उगा वीज वाया घालवू नये.

ग : येडा की खुळा. हा काय वीजेवर चालतो की काय ? त्यासाठी केवडी मोठी वायर लागंल जिमिनीवरनं,

श्री : बरं कमीत कमी हा पाचवरचा पंखा दोनवर कर लई थंडी वाजतीय इथं.

ग : तु काय वारा खायला आला काय ? कामाला लाग. आपल्याला खड्डे पाह्यचे आहेत.

श्री : आनी जमलं तर फोटू काडायचे हायेत.

ग : पा खाली पहा तर खरी. कसं छोटं छोटं दिसतंय सगळं.

श्री : गणप्या, ते पाहा. त्या गाड्या पहा कशा वरखाली उड्या मारत चालतायत.

ग : तुला खरं सांगू शिरपत, ते पाहून मला कसली तरी आटवण येतीय.

श्री : आटवण? ती रे कसली?

ग : मुंबईत येक एसेलवर्ड हाये. तितं असली रोलरकोस्टर का काय म्हंतात तशी मशीन हायेत. लोक पयसे देऊन जातात नि बसून येतात तिते. इथे सरकारने फुकटात सोय करून दिली समद्यांना तर लोक बोंबा मारत्यात.

श्री : कल्यानकारी सर्कार म्हनत्यात ते ह्येच कारं गणप्या ?

ग : आक्शी खरं बाबा. पहा शिरप्या पहा तो स्कूटर्वाला कसा पडला डोक्यावर.

श्री : नुस्ता पडला नाय बाबा, परत उटला बी पुन्यांदा नि परत चालवू लागला त्याची दुचाकी. माला वाट्टं त्याला सवय जाली असणार पडायची.

ग : माला तर ही सरकस वाटू लागलीय बाबा.

श्री : खरंच सरकसच हाय ही. ( जोरात ओरडतो ) आरं गणप्या, तो पाहा रस्ता.

ग : किंचाळतो कसाला? रस्ता पाह्यला नाय का कदी ?

श्री : असा सर्व एकदम नाय पाह्यला लई दिसात. थांब म्या फोटू काडतो.

ग : आपण खड्डे पाह्याला आलो का रस्ते?

श्री. गणप्या, तुला कळत न्हाई. आजकाल पेप्रात कसले फोटो येतात?

ग : बघ हां, आज पुरवणीच्या पैल्या पानावर सोनमचा हाये नि पेज श्रीवर मल्लिकाचा.

श्री : हात लेका. मेन पेपर बघता की नाय ? त्यात सगळीकडे खड्ड्यांचे फोटू हायत.

ग : मंग?

श्री : मंग आपण हा अखंड बिन खड्ड्यांच्या रस्त्याचा फोटू देऊ 'दैनिक शांतता' मदे. लोकं विसरली असणार कसा दिसतो अखंड रस्ता ते.

ग : शिरपत तु बी येक सॅंपल हायेस.

श्री : आरं, इथून तिथून सारे खड्डे सारकेच, या रस्त्यावर काय नि त्या रस्त्यावर काय ? त्यात फोटू काढण्यासारखं काय अस्तं का? आपला हा फोटू यील बघ पेपरात छापून.

ग : बरं, बरं. ते पाहा तिकडे, लोकं काय करतात आहेत? त्यांच्या हातात छत्री हाये. ड्रायव्हर इमान थोडे खाली घ्या.

श्री : ड्रायव्हर काय ? पायलट म्हंत्यात त्याला.

ग : ठीके, पायलट जरा खाली घ्या, बघू तर काय करतात आहेत्ते?

श्री : आरे, ते त्या पावसात खड्डे बुजवून राह्यलेत पाहा. पाहा किती मेहनत. कदी पाह्यलंय लोकांना एवढं काम करताना?

ग : पण पावसात पुन्यांदा रस्ता वाहून ग्येला तर?

श्री : येडा तु रं गणप्या. वाहिला तर परत बनवा. ह्यालाच तर म्हेनत म्हंत्यात. आक्षी कर्मयोग ! आणि तुम्ही लोक सर्कार काय करत न्हाई म्हणून टीका टिपण्णी करतात. किती वाईट वाटत असेल काम करणार्‍यांना ?

ग : आनी शिरपत ते रंगीत पट्टे दिसत्यात ते कसले रं?

श्री : ते पेव्हर ब्लॉक नी खड्डे बुजवले त्यांची नक्षी दिसून राह्यलीय.

ग : फेवर ब्लॉक ? ह्यो काय कसला फेवर रे बाबा ?

श्री : फेवर न्हाई, पेव्हर म्हन्यात त्याला. पेव्हमेंटावर लावतात ते म्हणून.

ग : पेव्हमेन? त्ये काय अस्तं?

श्री : पेव्हमेंट म्हंजे फूटपाथ, काही काही रस्त्याच्याकडेला अस्तात, त्यावर फेरीवाले बस्तात, नायतर झोपड्या बांधतात त्यांना फुटपाथ म्हंत्यात.

ग : आरे पन हा तर पेवमेन म्हाई, रस्ता हाये.

श्री : मंग काय होतंय त्याला? पण गणप्या आज पाहून घे, उद्या दिसनार न्हाई परत.

ग : कारं असं बोलतोय? उद्या आसू की आपन.

श्री : आपन आसू पण हे पेव्हर नसतील की.

ग : का रं?

श्री : का काय इचारतोस? पावसात वाहनार न्हाईत का ते? मग उद्या परत नव्याने भरनार.

ग : म्हंजे नवी म्हेनत? नवा खर्च ?

श्री : मंग त्याला काय? अरं पालिका हाय ती. ती म्हेनत करनारच. किती कामसू हाय पाह्यलं ना ? येकच काम परत परत करील. तुझ्या क्रूश्नाने सांगितले तसे फळाची अपेक्षा न्हाई बरं, खड्डे भरलेले राहो न राहो पालिका काम करनार म्हंजे करनार.

ग : क्रूश्नाचे नाव काडलंस म्हणून मला एक इचार आला बघ शिरपत.

श्री : नगं रे इतका इचार करूस, सवय न्हाई तुला, थकशील.

ग : ते सोड. म्हाभारतात पन रस्त्यात खड्डे व्हतेच. नायतर ते कर्णाचं चाक कसं आडकलं अस्तं? बोल बोल आता.

श्री : खड्ड्यात न्हाई, चिखलात रूतले व्हते.

ग : चिकल का झाला? रस्ता न्हवता म्हणून ना? रस्ता असता तर चिकल जाला अस्ता का? मग चाक ही आडकलं नस्तं नि करणाचा जीव ही ग्येला नस्ता.

श्री : म्हंजे खड्ड्यांमुले जीव गेलेला कर्ण पहिला असनार.

ग : अगदी बरोबर बोल्लास पाहा. थोडक्यात या खड्ड्यांना पन इतिहास हाये.

श्री : असनारच आपली प्रत्येक गोष्ट त्या प्राचीन ग्रंथात हाये म्हंत्यात ते कसं खोटं असेल. बरं वाजले किती ?

ग : बराच उशीर झाला की रं. मीटर वाढेल. पायलट. इमान थांबव बाजूला. उतरतो आम्ही इथंच. किती झाले?

श्री : किती होनार ? समज तू हाटेलात गेला नि तिथे काय मागवली, बोलाची कढी आनि बोलाचा भात. तर किती बिल यील? तेवढेच बील इथेबी. चल देऊन टाक. आनी उतर.

हेलिकॉप्टर उतरल्याचा आवाज.

श्री : तर मुलांनो आज आपण काय शिकलो? खड्डे महाभारत काळात ही होते. ते आपल्या संस्कृतीचा भाग आहेत. आणि दोन, छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मानायला शिका. खड्ड्यांतून जाताना तुम्हाला बिना तिकीट रोलरकोस्टर राईड मिळते. त्याचा आनंद घ्या.

ग : बरंका मंडळी, हा शिरपत शाळामास्तर होता. आता रिटायर झाला पण जित्याची खोड काय जाते? तर मंडळी, आता पुन्हा भेटू पुढच्या आठवड्यात. तो पर्यंत रामराम.

श्री : रामराम मंडळी.

*****

या श्रुतिकेने काय फरक पडेल असे तुम्हाला वाटते?

हे सारे लिहिणाऱ्या लेखकावर आकाशवाणीवर अघोषित बंदी येईल. घोषित बंदी घालायला ही काय मोगलाई नाही, लोकशाही आहे. मिडीयाची ताकद, ताकद म्हणतात ती हीच ! आणि ते खड्डे? ते मात्र तिथेच आणि तसेच राहतील. पुढे मागे त्यातील काहींना हेरिटेज स्टॅटस ही मिळू शकेल !

९

## नवयुग फर्निचर : नव्या युगाची नवी सुरूवात ( एक बातमी कम जाहिरात )

पेड न्यूजचा जमाना आहे म्हणे. जाहिरातीचे युग आहे पण आता लोक जाहिरातींना भुलत नाहीत. पेपरात मारे अख्ख्या पानावर जाहिरात द्या, लोक ते अख्खे पानच एखादा अभ्यासाचा धडा ऑप्शनला टाकावा तसे ऑप्शनला टाकतील आणि पुढच्या पानावर पोहोचतील. इंग्रजीत दोन गंमतीदार शब्द आहेत. त्यातला पहिला म्हणजे फूटफॉल. म्हणजे एखादे नवे दुकान किंवा अख्खा चकचकीत मॉल उघडला. आपण काय म्हणू? तिथे कुत्रंसुद्धा फिरकत नाही म्हणून. पण इंग्रजी ही आशावादींची भाषा. सकारात्मक विचारांची. ते फक्त त्या मॉलात किती पावले पडली हे मोजतात. एका माणसाला दोन पाय याप्रमाणे भागाकार करतात, कुत्रं आले तर चारनी भागावे लागेल एवढे भान ठेवले तर पुरे. अर्थात 'कुत्रे सुद्धा न फिरकणे' असा वाक्प्रचार इंग्रजीत नाही त्यामुळे कदाचित हा प्रश्न उद्भवणार नाही. दुसरा गंमतीदार शब्द म्हणजे गेटींग आयबॉल्स. म्हणजे एखादी गोष्ट बघण्यास भाग पाडणे. टीव्हीवर कार्यक्रम स्पॉन्सर करायचा तर लोक जाहिरातीच्या वेळात टीव्ही म्युट काय करतात, कामेच काय उरकून घेतात नाहीतर दुसरा चॅनेल लावून बसतात. लोकांना ती जाहिरात बघायला भाग पाडणे कठीण. अशा परिस्थितीत पेपरात बातमी म्हणून छापवून आणणे हाच काय तो मार्ग उरला. बातमी म्हटली की लोक गंभीरपणे वाचतात. म्हणून आपली जाहिरात बातमीसारखी छापून आणा. खाली मुंगीएवढ्या अक्षरात जाहि. किंवा ADVT लिहा म्हणजे आपल्या जाहिरातीला बातमीचे मूल्य मिळेल. काहीतर हे जाहि. वगैरे छापायच्याही फंदात पडत नाहीत. याचा फॉरमॅट बातमी सारखा किंवा एखाद्या लेखासारखा वाटला तर तेच याच जाहिरातींचे यश आहे. नवयुगातील ही नवयुग फर्निचर ची अशीच एक बातमी कम जाहिरात वानगीदाखल.

ही एक पेपरच्या 'घर आणि वास्तु'च्या गुळगुळीत पुरवणीत प्रसिद्ध झालेली 'बातमी' आहे.

**'नवयुग फर्निचर'चे ( New Age Furniture ) आधुनिक ऑफिसेससाठी आधुनिक फर्निचर !**

प्रख्यात घोडावाला आणि गाढववाला कंपनीने फर्निचर क्षेत्रात उडी घेतली असून आधुनिक ऑफिसेसमध्ये शोभेल असे फर्निचर बाजारात आणले आहे. कंपनीचे सीईऑ श्री.माणिकचंद गुलाबराय घोडावत यांनी आज या फर्निचरबद्दल माहिती दिली. हे फर्निचर आजच्या काळाशी आणि फास्ट लाइफशी सुसंगत बनवण्यात आल्याचे घोडावत यांनी सांगितले. कंपनीने बाजारात आणलेली ही नवीन उत्पादने :

लोकपाल टेबल :

दिवस भ्रष्टाचारबद्दल बोलण्याचे आहेत. तेव्हा प्रत्यक्ष पैशांना हात न लावता टेबलाखालून पैसे घ्यायची सोय करणारे हे टेबल म्हणजे आधुनिक जमान्यातील अत्यंत उपयोगी असे उत्पादन आहे. आपल्या समोरील व्यक्तीस या टेबलाच्या पेटीत पैसे टाकताना एखाद्या मंदिरात पैसे टाकल्याचा फील देणारे हे टेबल आहे. यात समोरील व्यक्तीस पैसे टाकण्यासाठी एक फ्लॅप देण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष पैशांना हात न लावल्याने अधिकाऱ्यांस नैतिकता पाळणे सोपे होते, तसेच पैशाला हात न लावल्याने कायद्याचेही हात इथे पोचू शकत नाहीत असा कंपनीचा दावा आहे. मागे काही पुढाऱ्यांना पैसे हातात घेताना फोटो काढून पकडण्यात आले होते. यावरूनची ही कल्पना आमच्या डिझाईनिंग विभागास सुचली आहे असे घोडावत यांनी सांगितले. यातील डीलक्स मॉडेल मध्ये फ्लॅपमधून सरकवलेले पैसे थेट आपल्या लॉकरमध्ये पोहोचण्याची सोय आहे. दोनही मॉडेल्स मध्ये ऑटोमॅटिक नोटा मोजणारे मशीन बसवले असून हे मशीन सध्या कंपनी इंट्रोडक्टरी ऑफर म्हणून दोनही मॉडेल्सवर मोफत देत आहे.

स्लिपिंग अटॅचमेंट :

सरकारी ऑफिसेस मध्ये काम कमी असले की झोप काढावयास मिळावी यासाठी स्पेशल अटॅचमेंट कंपनीने आणली आहे. टेबलावर डोके ठेऊन झोपणे हे आरोग्यदायी नसून त्याने मानेचे विकार जडू शकतात. म्हणून कंपनीने टेबलास जोडावयाची ही अटॅचमेंट विकसित केली आहे. ती रिमूव्हेबल आहे आणि फोल्ड होऊन टेबलाच्या खालच्या बाजूस राहू शकते. या अटॅचमेंटला फोमचे मुलायम आवरण असल्याने झोप छान लागते व आपण ताजेतवाने होऊन उठता. त्यामुळे जागे झाल्यावर आपली उत्पादकता वाढते असा दावा कंपनीने केला आहे.

बॉस अॅलर्ट :

ऑफिसमधली झोप कधीच शांत नसते कारण कधीही येऊ शकणाऱ्या आपल्या बॉसचे टेन्शन. यावर उपाय म्हणून आपल्या बॉसच्या आवाजाला ओळखणारे तसेच त्याच्या बुटाचा आवाज ओळखू शकणारे असे बॉस अॅलर्ट हे अत्याधुनिक मशीन कंपनीने बनवले आहे. बॉस आपल्या पासून शंभर मीटर दूरीवर असल्यास त्याच्या बुटाच्या किंवा बोलण्याच्या आवाजाला ओळखणारे सॉफ्टवेअर यात आहे. आपल्या वरील दहा लोकांचा डेटा यात सेव्ह होतो व यातील कोणीही जवळ येत असल्यास याची सूचना तुम्हाला मिळते. या मशीन मध्ये व्हायब्रेटिंग मोड आहे ज्याची इंटेंसिटी आपल्याला हवी तेवढी अॅडजस्ट करता येते. 'कुंभकर्ण' हे याचे पुढचे अपडेटेड व्हर्जन असून यात झोपलेल्यास गदागदा हलवून जागे केले जाते. त्यामुळे गाढ झोपेतूनही जाग नक्की येऊ शकते. ही सर्व डिव्हायसेस अत्यंत आवाजरहित आहेत. स्लिपिंग अटॅचमेंट बरोबर घेतल्यास बॉस अॅलर्ट हे डिव्हाईस कंपनी निम्म्या किमतीत मर्यादित काळासाठी देत आहे.

सूचना पेटी कम पेपरश्रेडर :

आजकाल ऑफिसातून कंप्लेट बॉक्सेस असतात, त्यात सूचना व तक्रारी टाकाव्यात अशी सूचना असते. त्या कोणी वाचत नाहीत हे खरे पण तरी मधून मधून ते रिकामे करणे भाग असते. त्या सर्वांची विल्हेवाट लावणे वगैरे अधिकच काम पडते. कंपनीने यावर उपाय शोधला आहे. टाकलेल्या कागदाचे टाकल्या टाकल्या छोटे छोटे तुकडे हे मशीन करून टाकते. खालील फ्लॅप उघडून हा कचरा साफ करता येतो. ही सोय सर्व ऑफिसेस मधून उपलब्ध करून देता येईल. यामुळे या अनुत्पादक कामावरील वाया जाणारा वेळ वाचेल व प्रशासन गतिमान होईल असा कंपनीचा दावा आहे.

कॉम्प्युटर स्पेशल स्क्रीन :

कामातून विरंगुळा हा प्रत्येक कर्मचाऱ्याचा हक्क आहे. त्यामुळे सर्वांचीच उत्पादकता वाढते. त्यामुळे विरंगुळा म्हणून कॉम्प्युटर गेम्स खेळले जातात. असे असले तरी आपल्या सीनियर्सना हे पटेलच असे नाही. त्यांनी तुम्हाला हे गेम्स खेळताना पाहिले तर तुमचे इंप्रेशन खराब होऊ शकते. हे टाळायचे असेल तर कॉम्प्युटर स्पेशल स्क्रीन ला पर्याय नाही. यामुळे लांबून बघणाऱ्याला गेम्स न दिसता आपली कामाची विंडो उघडी असलेली दिसते. बॉस अॅलर्ट सारखीच याची रचना असून जवळ येणाऱ्या आपल्या सीनियरला

ओळखणारे सॉफ्टवेयर यात आहे. आपले सीनियर्स वरील इंप्रेशन त्यामुळे सांभाळता येते आणि आपले मानसिक संतुलन नीट राखता आल्याने आपली उत्पादकता वाढवता येते असा कंपनीचा दावा आहे. पूर्ण ऑफिसात सर्व वर्कर्सनी हा स्क्रीन लावून घेतल्यास पन्नास टक्क्यांची बचत करता येईल. त्याच प्रमाणे हे स्क्रीन्स लावल्याचे गुपित कंपनी राखेल असे कंपनीकडून सांगण्यात आले आहे.

आजच्या फास्ट जमान्यात ऑफिसचे हे फर्निचर आपल्या सर्वांच्या उपयोगी पडेल असा विश्वास श्री. घोडावत यांनी व्यक्त केला आहे. आपल्या फर्निचरची रूपरेषा आणि संकल्पना काल त्यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली.

१०

## जागतिक अंधश्रद्धादिना निमित्ताने

*अखिल भारतीय अंधश्रद्धा जतन संस्थेचे संस्थापक नि प्रमुख रामनारायण राघवेंद्र कडकोळ यांचे अंधश्रद्धा दिनानिमित्त झालेले भाषण.*

*अंधश्रद्धा संमेलन नुकतेच उचलकरंजी येथे संपन्न झाले.*

माझ्या प्रिय बंधु भगिनींनो,

सर्व प्रथम उशीरा आल्याबद्दल क्षमस्व. म्हणजे आम्ही निघालो अगदी वेळेवर पण आमच्या गाडीसमोरून एक काळी मांजर आडवी गेली. आता आली पंचाईत. खाली उतरून सात पावले मागे जाऊ म्हटले. पण ते मनास पटले नाही. मांजर जर आडवी गेली असेल गाडीस तर आम्ही सात पावले मागे जाऊन काय फायदा? गाडीच मागे जायला हवी की नको? आम्ही शास्त्राचा योग्य अर्थ लावला नि रिव्हर्समध्ये सात किलोमीटर गाडी मागे घेतली. त्यामुळॆ हा उशीर. पण या कृतीमुळे आम्हाला मनास अपार शांती मिळाली हे मात्र खरे.

आता आम्ही या दिनास अंधश्रद्धादिन का म्हणतो? कारण आम्ही त्या पुरोगाम्यांच्या नाकावर टिच्चून सांगणार आहोत कि आम्ही असू अंधश्रद्ध, काय तुम्ही आमचे वाकडे कराल? त्या दिवशी आपण मॅच पाहताना बघितले, तो कोण तो लांब केसवाला खेळाडू एका पायात काळा तर दुसऱ्यात लाल मोजा घालून येतो म्हणॆ. तर तो कोण बॉलर फक्त डावाच पाय प्रथम टाकतो. या त्यांच्या अॅक्शननी त्यांनी आजपर्यंत किती विक्रम केले असतील? तो आणखी दुसरा कोणी खेळाडू मॅच आधी फक्त अळूचे फदफदे खातो म्हणॆ. भारतीय संघात मराठी टक्का घसरत असताना कोण बरे हा महाराष्टीय खेळाडू? थोडक्यात काय ही श्रद्धा की अंधश्रद्धा महत्त्वाची. त्या जोरावर कोणी सेंच्युरी करेल तर कोणी पाच विकेट्स घेईल. प्रश्न फक्त श्रद्धेचाच आहे हे खरे.

मनुष्य नि बाकी प्राण्यांत फरक आहे. सिंह शिकार करताना कधी लकी म्हणून आपल्या आयाळीस पांढराच किंवा लालच बँड लावताना कोणी पाहिले वा ऐकले आहे का? पाण्यातील मासा पण झोपून उठतो तेव्हा फक्त डाव्या कुशीवरूनच उठेल असे होते का? मानवासच फक्त बुद्धीचे वरदान आहे. ती वापरून माणूस नवनवीन शिखरे गाठतो नि तळही

गाठतो आहे. बुद्धी नि भक्ती ही देवाने मनुष्यास दिलेली वरदाने आहेत. ती न वापरल्यास माणूस आणि अन्य प्राण्यांत फरक तो काय राहिला?

आता मुद्दा येतो तो श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांत फरक काय? अगदी सोपा आहे तो. मूठभर पुरोगाम्यांना वाटते ती श्रद्धा आणि आपल्या सारख्या जनसामान्यांस वाटते ती म्हणे अंधश्रद्धा. आम्हाला आमच्या देवाची आणि त्या देवाच्या पृथ्वीतलावरील अवताराबद्दल वाटते ती म्हणे अंधश्रद्धा. आम्ही आमच्या पूज्य गणारामस्वामींच्या चरणी लीन होतो. ते पाहून हे म्हणतात महाराजांच्या पायी पडून गरीब अजून दीन होतो म्हणे ! महाराजांचे भक्तच ते. श्रद्धेने देत असतात. भक्तीपायी आपल्या भौतिक संपत्तीचे भान भक्तांना राहात नसेल तर त्या भक्तीचा दर्जा किती उच्च असेल हे आम्ही सांगायची गरज नाही. यास हे लोक गरिबांचे एक्सप्लॉयटेशन म्हणतात तर यांच्या सारखे कर्मदरिद्री हेच !

आता मला सांगा गुप्त धनाची आशा कोणाला नसते? उद्या ह्या पुरोगाम्यांच्या बुडाशी सोन्याच्या नाण्यांचा हंडा सापडला तर काय यांना नको असेल? पण ते शोधून देणाऱ्या साधुपुरूषांवर यांचा राग का असावा? यांची पोटे भरलेली असतात म्हणून? भरल्या पोटी ताटात हात धुताना यांना जांभई येते. ती आवरता आवरता यांना असले विचार सुचतात.

भानामती काय किंवा भूतखेत उतरवणे काय ही तर आमच्या आणि इतरही अनेक महाराजांची स्पेशालिटी. यांना वाटते की स्पेशालिस्ट्स फक्त यांच्या मोठमोठ्या हॉस्पिटलांत आहेत म्हणून. आपल्या बहुजनांचे हेच तर संरक्षक आणि त्राते आहेत. तुमच्या फिया परवडतील काय आमच्या गोरगरिबांस? आमच्या गावचा गणेश. त्याची बायको आजारी पडली. गेला डॉक्टरकडे. चांगली पाचशे रूपयांची फी भरली. घेतली आठवडाभर औषधे. मला भेटला तर बरी होतेय म्हणाला. परत जायचे होते त्याला डॉक्टरकडे. मी म्हटले काही नाही. दैवी उपचारच करू. खेचून त्याला आमच्या गणारामबाबांच्या पायी घातला. अंगारा नि बुटीच्या पुड्या दिल्या. चांगला बोकड कापला. बोकडच कापला ना? की तुमचा खिसा कापला? की वाघ सिंहाचा बळी घेतला? बोकडाचे मटण खाताच ना तुम्ही पण? आता झाला असेल वीसएक हजारांचा खर्च पण गणेशची बायको अगदी ठणठणीत बरी झाली. म्हणजे तीन महिन्यांनी गेली बिचारी पण येणारा माणूस जाणारच. पण जाईपर्यंत अगदी बरी होती. कशाला हवा तुमचा महागडा डॉक्टर आणि हॉस्पिटल?

आता आयुष्य आहे तर समस्या आहेतच. सर्वांनाच आहेत. त्या सोडवायच्या कोणी?

सुख साखरेचा दाणा
दु:ख हवे तितके आणा

असे महाराज म्हणतात. समाजात समस्यांस अंत नाही. कोणी जादूटोणा करतो, मूठ मारतो, वशीकरण करतो. भूताची बाधा होते. आहेत तुमच्याकडे यावर उपाय? गोरगरिबास भूतबाधा होत असेल तर या पुरोगाम्यांस ग ची बाधा झाली आहे. भूत तर आमचे महाराज उतरवतील पण यांची ग ची बाधा कोण उतरवेल? आता भूत उतरवायचे तर काय कोंबडी नाहीतर बोकडाचे दान करावे लागेलच. अगदी स्ट्रॉंग भूतास एखादा नरबळी पण लागत असेल. त्यासाठी अशी हाकाटी हे करतात? यांच्याकडे आहेत उपाय या सर्वांसाठी? उघडतील यांच्या हाय फाय हॉस्पिटलांत हे भूतबाधा विभाग नि पिशाच्च विभाग? मग या सर्व समस्या सोडवणार कोण? खरे शास्त्र आमचे आहे. विज्ञान हेच थोतांड आहे. यांना विज्ञानाची कावीळ झाली आहे. यांना सगळीकडे शास्त्र दिसते. विज्ञान पुरावा मागते म्हणे. अरे पुराव्याने शाबीत झाले म्हणजे झाले? पुरावाच खरा याला काय पुरावा? आता हवा दिसली आहे कोणास? म्हणून ती नाही असे म्हणाल? मग या भूतखेतांचा पुरावा मागता? मुळात यांचे विज्ञान हीच एक अंधश्रद्धा आहे. पुरावा मिळाला म्हणून ती गोष्ट खरी मानायची काय? हे लोक प्रयोग करतात नि विज्ञानाची कास धरतात म्हणे. कास धरा की कासेची लंगोटी धरा पण जनसामान्यांना का भरीस पाडता? त्यांना इथे जगण्याची भ्रांत त्यांना तुम्ही भरल्या पोटी हे विज्ञानाचे डोस पाजताय? कोठे जावे या गरीबाने? तुमची विज्ञानाबद्दलची श्रद्धा परवडेल का आम्हाला?

शेवटी या धर्माअधर्माच्या गोष्टी कोणी कोणास सांगाव्या? आम्ही ऐकतोय म्हणून आमचा पेशन्स ताणू नका. आमची डोकी भडकली तर त्यातून अंगार बाहेर पडेल आणि सारे राख करून सोडेल. हा इशारा नाही तर धमकीच आहे हे आम्ही सांगून ठेवतो. यांची मिजास आमच्या सहिष्णुतेवर आहे. एवढी हिंमत बाकी धर्मांविरूद्ध दाखवाल? आहे हिंमत? मुंडकी छाटून ठेवतील एकेकाची. बाकी एक मागास असतील तर आम्ही दहा पटीने मागास राहू. बघू कोण आम्हास अडवतो ते? आणि आम्हाला अभिमान आहे त्याचा.

आज या अंधश्रद्धा दिनानिमित्ताने आम्ही एक बोकड कापून या दिनाचे महत्त्व आपल्या सर्वांच्या लक्षात आणून देत आहोत. बोकडाचे बलिदान वाया जाऊ देऊ नये ही

जबाबदारी आता तुमची आहे. प्रत्येक प्राणाचे मोल अनमोल आहे हे आम्हांस कळतेच आम्ही समतेचा ढोल बडवत नसलो तरी. हे निर्मूलक, यांना जिवाची किंमत नाही. सर्व समान आहेत म्हणे. यांना जात पात नाही, उच्च नीच मान्य नाही. देवाघरी सारे समान म्हणे. पण मला एक तरी समान गोष्ट दाखवा. हाताची पाच बोटे समान नाहीत, डोळ्याची बुबळे समान नाहीत. एका माणसासारखा दुसरा माणूस नाही. आणि हे निघाले सर्वांना एकाच मापाने मोजायला. विषमता आहे म्हणून समाज आहे. विषमता हेच सत्य आहे. आणि तीच खरी जोपासण्याची गोष्ट आहे. हाच या दिवसाचा खरा संदेश आहे. आमच्या गणाराममहाराजांसारखे अजूनही काही योगी पुरूष असतील. त्यांना नमून या दिवशी खरीखुरी अंधश्रद्धा जोपासण्याचा पण आपण करू.

११

## हसा मुलांनो हसा

*काळ बदलायला वेळ लागत नाही म्हणतात. वर्तमानकाळ हा भविष्यकाळातील भूतकाळ असतो. दिवस तर झपाट्याने बदलत चालले आहेत. इतके की कालचे पाहिलेले आज ओळखू येऊ नये. फार वर्षांपूर्वी दारावर माकडवाले यायचे. हातातील डमरूच्या आवाजात माकडेही खेळ दाखवायची. नंदीबैलवाले यायचे, गुबूगुबूच्या आवाजावर मुंडी हलवायचे. कडकलक्ष्मी यायची, डोंबारी होते, कठपुतलीवाले होते, गावागावात वासुदेव असे. दुर्मिळ प्रकारात अस्वल घेऊन दरवेशी येई. या साऱ्यांना आपापला प्रेक्षक वर्ग असे. मुले धावत जाऊन गर्दी करीत. त्यातीलच मी एक दिल्ली का कुतुबमिनार और हेद्राबादका चारमिनार देखोचा खेळ दाखवणारा. डोक्यावर मशीन उचलून गल्लीबोळात फिरत असे. पोरे सोरे मागे लागत. चार पैशांची कमाई होई. गेले ते दिन. पोरे आता टीव्ही नावाच्या राक्षसाच्या ताब्यात आहेत. आमच्या सारख्यांचे खेळ आता पोरे ढुंकूनही पाहात नाहीत. तरी राहवेना म्हणून आलोय हा खेळ दाखवायला नि पोरासोरांना हसवायला. एक शेवटचा प्रयत्न....*

या मुलांनो लवकर या
आमचा खेळ पहायला या
धावत या पळत या
अभ्यास बिभ्यास सोडून या
सुंदरती पहिली दुनिया पहायला या
पहा पहा आणि हसा हसा
मी म्हणतो म्हणून हसा
समजले तर हसाच न समजले तरी हसा
हसण्यासाठी जन्म आपुला
तेव्हा या पहा नि हसा
पोटदुखेपर्यंत हसा
फक्त चकटफु तेव्हढे नको.
डोळे लावा त्या खिडकीत

नीट पहा नि हसा हसा

ते पहा हे पहा
त्यांची गांधी टॊपी पहा, त्या टोपीचा कोन पहा
त्या टॊपी खालील माणसाने तुमच्याकडे रोखलेले बोट पहा, त्या बोटाचे टोक पहा
'तूच आहेस तुझ्या या स्थितीला जबाबदार, ' त्यांचा हा उपदेश ऎका.
आम आदमीला आम ठेवणारे नेतृत्व म्हणतात त्याला
कधी सेक्युलर, कधी स्युडो सेक्युलर
नेतृत्वच ते. त्याच्याकडे नीट पहा
ते पुढे पुढे जात आहेत
त्यांच्या मागे धावू नका
त्यांचा स्पीड खूप आहे
तोंड आपटून पडाल
फक्त त्यांचा खेळ पहा नि हसा
पॉवर्टी बिवर्टीची लाईन त्यांनी आखली
त्या लक्ष्मणरेषेकडे पहा आणि त्याच्या खालीच रहा
मग तुम्हाला ते कसे हात देतात ते पहा
येते की नाही हसू
येणारच, नाही हसलात तर पैसे परत
छान आहे की नाही
बच्चे लोग बजाव टाळी

आता हा दुसरा सीन पहा
यांच्या मागे एक मंदिर आहे
त्यांच्या अंगात भगवे कपडे आहेत
ते काय बोलताहेत ते ऎका
नीट लक्ष द्या, सांभाळा
कारण अति धार्मिक आहेत ते, कर्मठ देखील बरं
काहीतरी बोलाल नि त्यांचे व्रत मोडेल
फट म्हणता ब्रह्महत्या कराल नि त्यांच्या शापाचे धनी व्हाल
काय म्हणतात ते?
घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याची हिंमत आहे त्यांच्यात

ऐका आणि हसा.

समजले तर समजले म्हणून हसा, नाही समजले तर तसे म्हणून हसा

पण जरा जपून बरे, त्यांना दिसू देऊ नका तुम्ही हसता आहात ते

ते शाप देतील तर त्यांच्या शापाने शिळा होऊन पडाल

कारण यांच्या मागे आमच्या संस्कृतीची ताकद आहे

त्यामुळे यांचा शाप अगदी पॉवरफुल्ल आहे बरे, तेव्हा जरा सांभाळून

मनातल्या मनात हसा

पुराणातली वानगी म्हणून त्यांचे बोलणे हसण्यावारी नेऊ नका

त्यांच्या पुराणातील कथात पुढचे संकेत दिसतात ते पाहून हसा

आणि मुख्य म्हणजे त्या देवळाच्या कळसाला नमस्कार करायला विसरू नका

आले की नाही हसायला?

नाही आले तर पैसे परत

बच्चे लोग बजाव टाळी

आता बालकांनो तिसरा सीन पहा

एकेक राज्यातून कसे छान चित्ररथ आलेत त्यांचा सीन पहा

काहींकडे कंदिल आहे, काही घड्याळे घेऊन उभे आहेत

कोणी हत्तीवर तर कोणी सायकलीवर स्वार, कोणाच्या हातात विळा कोयता दिसतोय

कोणी झाडाची दोन पाने हातात घेऊन उभे आहेत

पहा नीट चित्ररथावरील ही दृश्ये

खरीखुरी माणसे आहेत ही बरे, खोटी नाहीत

नीट कान द्या, काय बोलतात सारे?

सारे एकाचवेळी किलकिलाट करतात म्हणून कळत नसेल म्हणून घाबरू नका

नाही कळले म्हणून बिघडत नाही. अंदाज बांधून हसा.

पण जरा सांभाळा. यातील बहुतेक शाप बिप देत नाहीत

सरळ उचलून नेतील आणि जेलात टाकतील

यांच्यावर हसण्याची तयारी असेल तर त्याची किंमत मोजायचीही तयारी ठेवा

नाहीतर सरळ मनातल्या मनातच हसा कसे

आले की नाही हसू? नाही आले तर पैसे परत

बच्चे लोग बजाव टाळी

तीन सीन्स पाहिलेत मुलांनो. आता चौथा पहा.

यांना सामान्य जनता म्हणतात. ओळखता की नाही यांना?

तुमच्या माझ्या सारखेच आहेत ते लोक

ते पण येतात कधी कधी खेळ पाहायला. वेळ मिळेल तेव्हा

त्यांच्याकडे पाहून हसा. नीट ओळख दाखवून हसा. नीट निरखून पहा. दिसतो काय त्या पहिल्या सीन मधल्यांत नि यांच्यात फरक?

काय म्हणता? पहिल्याने टोपी घातलीय?

त्या दुसऱ्याच्या अंगावर भगवी वस्त्रे आहेत.

कोणी निळी शाल पांघरली आहे तर कोणी हिरव्या कपड्यांत आहे.

अरेरे काय हे तुमचे निरीक्षण असे? नीट पहा.

त्या पहिल्या तिन्ही सीन मधल्या लोकांच्या अंगावर कवच कुंडले आहेत. दिसली का?

त्यांना कोणीच मारू शकत नाही. मारून पहा बाण. कर्णासारखे अवध्य आहेत ते.

कोण म्हणाले ते दानशूर पण आहेत म्हणून?

अगदीच हावरट आहात मुलांनो तुम्ही. आता काय निवडणुकीचा टाईम आहे की तुम्हाला ते काहीही देतील?

हे काय बिन मौसम भलतेच मुलांनो तुमचे.

ठीक आहे. मी सांगतो त्यांना द्यायला काही तुम्हाला.

ते देतील दो करांनी ते घ्या आपल्या चिमुकल्या हातांनी. घ्या घ्या लाजू नका.

घ्या तो बोलाचाच भात. पोटभर खा. ओरपा ती बोलाचीच कढी. खा त्या बोलाच्याच भाताबरोबर. भरेल ना पोट तुमचे? मग द्या पाहू छान पैकी ढेकर.

छान. कसे तृप्त दिसतायत तुम्ही मुलांनो.

*पाहिलेत चारही खेळ मुलांनो. आता टाका पैसे पटापट. नाही म्हणू नका. हसा, हसा आणि हसत पैसे टाका. गरिबाचे पोट आहे. आम आदमीचे हातावरचे पोट आहे, नाही म्हणू नका प्लीज.....*

१२

## 'क' करियर चा

आमच्या लहानपणी करियर गायडन्स वगैरे थेरं नव्हती. मूल मोठे झाले की आपसूकच शाळेत जाई, जमेल तसा आपल्या कुवतीने अभ्यास करी नि मोठा होई. अजून थोडा मोठा झाला की त्यास डालडाचा डबा बांधून पोहायला धाडत. आता डालडा आहे पण ते डबे नाहीत, चाळी गेल्याने डालडाच्या डब्यातील तुळसही नाही. आता ते डालडाचे डबे गेले नि स्विमिंग क्लासेस आले. अभ्यासासाठी कोचिंग क्लासेस आले. क्लासेसचा जमाना आहे. कारण प्रश्न करियरचा आहे.

पूर्वी हिशेब साधा सोपा असे. मूल थोडेफार हुशार आहे असे वाटले तर त्यास सायन्सला पाठवीत. जीवसृष्टीची त्यास आवड असेल तर डॉक्टर आणि स्क्रू, वायरी आणि खिळे अशा निर्जीवसृष्टीची आवड असेल तर इंजिनियर बनवण्याचे आईबाप ठरवीत. मग बाकी मुले कॉमर्स ला जात आणि बँकेत लागत. त्यातून उरलेली आर्टसला जात. या व्यतिरिक्त करियरमध्ये काही असते असे पालकास नि बालकांस ही वाटत नसे. मेडिकल न जमलेली मुले पॅरामेडिकल काहीतरी करित. नि इंजिनियर होऊ न शकणारी डिप्लोमा करीत. यात फार काही जास्त बदल होत नसे. काही अपवाद असत ते नियम सिद्ध करण्यापुरते. आमच्या वर्गात एक निमेश वाघेला म्हणून मुलगा होता. गुजराती भाषिक पण मराठीत हुशार आणि एकूण अभ्यासातही हुशार. आमच्या वेळी मार्क्स देण्यात पण कंजूषी असायची त्यामुळे जास्तीत जास्त मार्क असायचे ऐंशी किंवा ब्याऐंशी टक्के. आज सारखे शंभरात एकशे दोन टक्के मिळण्याचे ते दिवस नव्हते. त्यात हा निमेसभाई चांगला अठ्ठ्याहत्तर टक्क्यांनी पास झाला आणि शाळेत दुसरा आला. त्यानंतर याने काय करावे? तर शाळा सोडली. त्याच्या घरचे शिवणाचे दुकान होते, त्यात जेंट्स एक्सपर्ट म्हणून काम सुरू केले. आम्ही ग्रॅज्युएट होईतो याचे शिवायच्या कपड्यांचे खिसे फाडून स्वत:चे खिसे भरणे नीट सुरू होते आणि आम्ही अजून फिया भरत होतो. आमच्या काळातील पहिले एयरकंडीशंड टेलरिंग दुकान त्याने उघडले तेव्हा आमचा रिझल्ट लागायचा बाकी होता. आम्ही नोकरी शोधत होतो तेव्हा हा आपल्या छोट्या छोकरीलाकडेवरून घेऊन हिंडत होता.

असे अपवादही विरळाच होते. ( आज हा विरळा शब्दाचा वापर ही विरळाच झालाय ! ) बाकी आम्ही महाजन गत: स पंथ: मधीलच होतो.

करियर मार्गदर्शन नि ॲप्टीट्यूड टेस्ट ही आजकालची स्टाईल. मुलगा नुसता डॉक्टर नाही तर डोक्याचा बनावा की पायाचा स्पेशालिस्ट बनावा याचे ही मार्गदर्शन करतात म्हणे. आमच्या करियरची नौका आपोआपच किना-यास लागायची. आज ते दिन गेले. आता ते पालक नाहीत, शिक्षक ही नाहीत आणि डालडाचे डबे ही नाहीत. आणि अर्थात ती तशी मुलेही नाहीत. आजची मुलेच आपल्या आईबापांस 'चाईल्ड सायकॉलॉजी नुसार आम्हाला वाढवा' अशी मागणी आपल्या जन्मदात्यांकडे करायची शक्यता आहे. असो. बदलत्या काळाचा महिमा आणि काय?

करियरला मराठीत चरितार्थ असा साधा शब्द आहे. चरितार्थ म्हणजे आपले नि घरादारातल्यांचे पोट भरून चार पैसे कनवटीला लावायला देणारा पोटापाण्याचा उद्योग. इंग्रजीत यालाच करियर म्हणतात म्हणे. आजचा जमाना सबसे तेज. काल पाटा वरवंटा वापरून दळायच्या गोष्टी आज पाटा नुसता आडवा पाडायच्या आत मिक्सर मध्ये होतात.  एकूण सुगरणपणा त्यामुळे वाढला आहे. दोन मिनिटांत मॅगी नूडल्स बनवणारी आज सुगरण मानली जाते. सर्व काही तेज. इन्स्टंट. फक्त आजचा दिवस अजूनही चोवीस तासांचाच असतो आणि मूल जन्माला यायला अजूनही नऊ महिनेच थांबावे लागते. शक्य असते तर यात ही काही 'सुधारणा' झाल्या असत्या पण ते अजून झाले नाही हे खरे. असे असताना डॉक्टर नि इंजिनियर बनायचे असे वेळकाढू धंदे करायला सांगितले कोणी? दोनेक महिन्यात किंवा वर्षात शिक्षण नि वर्षात कमाई. कशाला हवीय अक्कल नि मेहनत?

*****

आजचा जमाना पण त्यासाठी कसा झाला आहे पहा. करियरच्या नवनवीन वाटा फुटताहेत. क करियरचा नि करियरच्या नवीन वाटा असे पेपरात येते आणि पोरांना या नव्या वाटा दिसायला लागतात. तरी देखील यात अजून हवा तसा रोखठोक पण नाही. म्हणजे खर-याखु-या करियरचा परिचय करून दिलाच जात नाही.

*****

आजचे सर्वात यशस्वी करियर अर्थातच राजकारणात आहे. नगरसेवक बना, मग आमदार, मंत्रीबिंत्री झालात तर ठीकच. इनिशियल इन्व्हेस्टमेंट सोडली तर नंतर येणारा खर्च आपोआपच भरून निघतो. आपली महत्त्वाकांक्षा किती यावर तुमचे पुढे जाणे अवलंबून असते पण अगदी झेड पी चे सभासद जरी राहिलात किंवा कोणत्या तरी छोट्यात

छोट्या पक्षाच्या जिल्हास्तरावरील अध्यक्षपदावर जरी असलात तरी पुरे. तुमची आवक सुरूच राहते. इंग्रजीत एक par excellence असा शब्द आहे. राजकारण हे त्या अर्थाने करियर par excellence आहे यात शंका नाही. ते न जमल्यास तुम्ही अध्यात्मिक क्षेत्रात येऊ शकता. डायरेक्ट बुवा किंवा स्वामी बनणे सर्वांनाच जमेलसे नाही पण जमल्यास त्यापरता दुसरा धंदा नाही. लोकांची अध्यात्मिक भूक भागवणे हे आपले जीवन ध्येय होऊ शकते. ते ही नाही जमले तर एखादे मंदिर काढा. या साठी फक्त एक शेंदूर लावलेला दगड बस आहे. रातोरात तो आपल्याला हव्या त्या मोक्याच्या ठिकाणी टाका नि विलंब न लावता दुस-यादिवशी तिथे छोटेसेच का होईना मंदिर बांधून टाका. स्वत: त्याचे पुजारी बना. लोक कधीच आपल्या देवभोळेपणावर शंका घेत नाहीत. हळू त्या देवाच्या दंतकथा पसरवा. देवाला कसली आलीय अनधिकृतता? त्यामुळे आजूबाजूची अनधिकृत बांधकामे पडतील पण तुमचे अगदी रस्त्यातील मध्यावर असलेले मंदिरही लोकच पाडू देणार नाहीत. शेवटी त्याच साठी होताना तुमचा 'मंदिर वही बनायेंगे'चा अट्टाहास? हळू हळू तुम्ही मंदिर 'टायकून' व्हाल पण कोणी तुम्हास तसे म्हणणार नाही कारण ते आपल्या धर्मात बसणार नाही. न म्हणोत. आपली करियर नीट फळाला येते ना हे महत्त्वाचे. या शिवाय ज्योतिषी बनणे, न्युमरॉलॉजिस्ट बनणे, वास्तुशास्त्र कन्सल्टंट बनणे अशा महत्त्वाच्या बाबीतही चांगले करीयर होऊ शकते. या सर्वांमध्ये काही समान धागे आहेत, ते म्हणजे, या सर्व बाबी आपल्या संस्कृतीत बसवून करता येतात, लोकांच्या विश्वासावरच अवलंबून चालतात, आणि कोणी काही बोलले तर लोकच चवताळून तुमचे रक्षण करतात. डॉक्टरला पेशंटला ठीक करावेच लागते, इंजिनियराने बांधलेला पूल कोसळून चालत नाही, वकीलास केसेस लढवाव्याच लागतात. या सर्वांस अकाऊंटीबिलिटी आहे. पण आपल्या नवीन करियर्सना याचा अपवाद. जोतिषाचे भविष्य चुकले म्हणून कोणी त्यास कोर्टात खेचत नाही, स्वामींनी मंत्र दिला नि तो फेल झाला म्हणून स्वामीजी काही जेल मध्ये जाणार नाहीत. या सर्वांचा फायदा घेणे न घेणे आपल्या हातात आहे.

याशिवाय ही काही जोड करियर्स आहेत. टीव्ही सगळीकडे पसरला. अखिल विश्व व्यापून उरला. त्यात न्यूज चॅनेल्स नावाची सर्वज्ञानी मंडळींनी चालवलेली करमणूक प्रधान चॅनल्स आली. यात ब्रेकिंग न्यूज पाठोपाठ लागणारे एक्सपर्ट सर्वच चॅनेल्सना लागतात. आपली त्यासाठी उपलब्धता महत्त्वाची. त्या त्या विषयातील थोडीफार माहिती

असणॆ एवढीच अट असते, आणि आपल्याला अस्खलित बोलता यावे लागते, एका चॅनेल मधून दुस-यावर जाण्यास पायाला भिंगरी असावी लागते. एकदा आपली तज्ञ म्हणून ख्याती झाली की टिंबक्टूतील निवडणुकांपासून आडणेगाव खुर्दच्या ग्रामपंचायतीतील धक्कादायक निकालांपर्यंत मत विचारले जाईल. हिंदी सिनेमातील हिंसा आणि मराठीतील अहिंसक सिनेमे यावर ही मत प्रदर्शनाचा तुम्हाला हक्क राहिल. वीजेपासून पाण्यापर्यंत सर्व प्रश्नांवर तुम्हाला उत्तरे यायला हवीत. हे सर्व जुजबी ज्ञान तुम्हास कमवावे लागते पण एकदा न्यूज चॅनल वरील तज्ञ बनलात की कामाला तोटा नाही. हळूहळू आपण आपला भाव वाढवत नेऊ शकता. याशिवाय वेगवेगळया डान्स, गेम्स नि गाण्यांच्या नि इतरही रियालिटी शोज मध्ये एक्सपर्ट म्हणून नवीन संधी कायम उपलब्ध असतात. त्यासाठी हे प्रोग्राम्स नीट पाहणे गरजेचे आहे. डान्स असेल तर एखाद्याची एनर्जी जोखणॆ महत्त्वाचे, त्या स्पर्धकाचे हातपाय हलतात म्हणून तो जगातील सर्वात सुंदर डान्सर आहे हे सांगता आले की झाले. गाण्यात सूर कसा सुंदर लागला आणि गायिका असेल तर ती उद्याची लता आहे हे सांगणे आले की तुम्ही एक्सपर्ट झालात. एखाद्याने काही करामत दाखवली की तोंडाचा आ वासून गप्प बसून राहाता आले पाहिजे. बाकीच्या काही बाबतीतही थोडे ट्रेनिंग लागेल, म्हणजे एकदम उठून टाळया वाजवणे किंवा शिट्या फुंकणे किंवा डायरेक्ट स्टेजवर जाऊन शाबासकी देणे वगैरे. तुम्हाला या विषयांतील सर्व यावयास पाहिजे असे वाटून घेऊ नका. काही स्पेसिफिक शब्द शिकले की झाले. जर चॅनेलची गरज असेल तर आपल्या सहकारी जज्जाशी भांडण्याची तयारी असेल तर तुम्हाला हिंदीत ही चांगला स्कोप राहिल. फक्त एकच लक्षात ठेवा की वारंवार जज्ज बनून आपण खरेच यातील तज्ञ आहोत असा भ्रम होऊ देऊ नका म्हणजे झाले.

या ही पेक्षा सेलिब्रिटी बनणॆ हा एक चांगला जोडधंदा आहे. यासाठी आपण सर्व प्रथम श्रीमंत असणे आवश्यक आहे. तसे नसाल तरी आपण तसे आहोत याचा आभास निर्माण करणे गरजेचे आहे. आपली लाईफस्टाईल इंग्रजीत फ्लॅशी म्हणतात तशी हवी आणि नको त्या पार्ट्यांना हजेरी लावता यायला हवी. आपले फोटो पेपरात पेज थ्रीत वरचेवर यायला हवेत. त्यासाठी थोडा खर्च लागला तरी भविष्याचा विचार करून हात सैल सॊडा. आपण 'फेमस फॉर बिईंग फेमस' व्हायचे एवढे ध्येय ठेवले की आपोआप रस्ते दिसतात. मग तुम्ही चित्र विचित्र कपडे घाला किंवा किंवा एखाद वेळेस काहीच घालू नका, एखाद्या विषयावर चित्र विचित्र कमेंट करा. जेवढा जास्त विक्षिप्तपणा तेवढा जास्त सेलिब्रिटी स्टेटस तुम्हाला मिळेल. हळू हळू तुम्ही फेमस झालात की मग टीव्ही वरील एक्सपर्ट म्हणून

बोलावले जाल, प्रमुख पाहुणे म्हणून उदघाटनाला जाल. रिबिनी कापाल. तुमच्या मताला काही किंमत आणि वजन मिळेल. एकूण तुमचे करियर बहरून येईल.

याहूनही इतर अनधिकृत धंदे आहेत. ते तसे असले तरी आपल्या देशात तसे सेफ आहेत. फक्त योग्य वेळी योग्य ठिकाणी हवी तशी कळ दाबता आली की जीवनभर तुम्ही सेफ राहू शकता. म्हणजे आपल्याला एखादी पतपेढी काढायची आहे. काढा. हळूहळू त्यातील पैशांची अफरातफर इतर पॉवरफुल लोकांना घेऊन केली तर पचून जाते. चीट फंड काढा. त्याच्या नावातच चीटिंग असल्याने आपण कोणास फसवल्याचा आरोप कोणी करू शकत नाही. सहकारी तत्त्वावर दुकाने काढा आणि त्याची व्यवस्थित वाट लावून दाखवा. या व्यवस्थितपणात उच्चपदस्थांस सहभागी करावे लागते एवढे ध्यानात ठेवलेले पुरे. नाहीतर तुम्ही बेटिंगच्या धंद्यात उतरा नि सरळ बुकी बना. दोन चार फोन आणि काही थोडे रूपये खर्चून काही वर्षांतच कोटींत खेळू शकाल. वरील सर्वांत थोडी रिस्क आहेच. पण जेवढी रिस्क जास्त तेवढा फायदा जास्त हे सर्वमान्य तत्त्व आहेच. काही वर्ष तुरूंगात काढायची मानसिक तयारी केलीत तर सुटून आल्यावर चैनीत राहू शकाल. आणि आपल्या देशातील न्यायालये तशी मुळातच दयाळू आहेत. तुरूंगातून हव्या त्या सोयी आपणच कमावलेल्या पैशांच्या जोरावर करून घेता येतात. आपल्या देशातील व्यवस्थेवर विश्वास ठेवा आणि वाकड्या मार्गाने सरळ आपल्या उन्नतीच्या मार्गावर चाला.

*****

काळ बदलतो तसा शब्दांचा अर्थ बदलतो. पूर्वी चरितार्थ शब्दात चाकरमानीपणा आणि कारकुनी डोकावायची. आम्ही आज शहाणे झालो. मराठीतही करियर हाच शब्द सर्वमान्य आम्ही केला आहे कारण त्यात चरितार्थाहून पुढे अजून काही आहे असा ध्वनित अर्थ आहे. चार पैसे कनवटीस लावणे एवढे मर्यादित ध्येय आजच्या मराठी नवतरूणास ठेवायचे असेल तर मात्र गोष्ट वेगळी. नाहीतर त्याने वेळीच डोळे उघडून आपल्या करियर मागे लागावे आणि आपले आणि आपल्या महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करावे.

१३

## पर्यावरण दिना निमित्ताने

पर्यावरणाबद्दल आमच्याकडे अति जागरूकता आहे. नुसत्या पर्यावरण दिनी नाही तर वर्षभर काही ना काही कारणाने आम्ही त्यावर चर्चा, विचार नि टीका करीतच असतो. त्याबाबतीत आम्ही जागरूक आहोत. आणि यासाठी आम्ही सर्व सणांची वाट पाहात असतो. दिवाळी आली की आम्ही फटाके उडवता उडवता त्याच्याने होणाऱ्या प्रदूषणाची चर्चा करतो. फटाके फोडून झाल्यावर आम्ही घरोघरी त्यावर टीकाही करतो. पेपरवाले ध्वनिप्रदूषणाने किती पातळी ओलांडली याची पाने भरून चर्चा घडवतात. वाचकांच्या पत्रांतही याबद्दल बरेच लिहून होते. मग पुढच्या दिवाळीची वाट पाहिली जाते. गणपतीबाप्पांच्या मूर्ती शाडूच्या असाव्यात की नाहीत, गणपती उत्सवाने सामाजिक अभिसरण करावे याबद्दल आम्ही जागरूक असतो. जागरूकतेचा भाग म्हणून याविषयांवर स्पर्धा घेतल्या जातात. लाऊडस्पीकरने गाणी ऐकताऐकता आम्ही धन्य होतो. मूर्ती विसर्जित केल्यानंतर त्या कशा परत येतात किंवा त्यांच्या रंगांनी पाणी कसे दूषित होते याबद्दल चर्चासत्रे झडतात, टीव्हीवर तज्ञ मंडळी आपला घसा फोडून बोलतात. दरवर्षी आमचा हा क्रम चुकत नाही. होळीच्या वेळी झाडांच्या तोडीने आमच्या डॉळयात पाणी येते. ते पुढच्या होळीपर्यंत सुकत नाही. कचरा टाकणे नि गलिच्छ वस्त्या वसवून त्यांचा सुधार करणे हा आमचा राष्ट्रीय छंद आहे. सणासुदीत आम्ही अशा चर्चा घडवतो की जणू त्या चर्चा ही त्या सणासुदीचाच भाग असावेत. आमचे लोक पण शहाणे आहेत. ते या सर्वात आनंदाने सहभागी होतात. एक बोलतो दुसरा लोकशाही आहे म्हणून ऐकून घेतो आणि लोकशाही आहे म्हणूनच दुसऱ्या कानाने सोडायचा आपला हक्क बजावतो. आमचा प्रदूषणाचा डाटा मात्र अचूक तयार असतो. प्रदूषण हे दूषण असून भूषण नाही याबद्दल मात्र आमचे एकमत असते. आमचा महाराष्ट्र प्रगत आहे म्हणतात तो उगाच नाही.

*****

सकाळी उठून दात घासता घासता पेपर वाचायची माझी सवय आहे. बेसिनचा नळ वाहता सोडून पेपर वाचायचा. पेपरातल्या बातम्या वाचता वाचता काही वेळ सहज निघून जातो. धावत्या पाण्यात दात घासणे नि दाढी करणे मला आवडते. आजचा पेपर खास. आज पर्यावरण दिन. म्हणजे राज्यात कार्यक्रमांना उधाण येणार. उद्या सर्वांचा

डिटेल वृत्तांत येणार. उद्याच्या पेपराची मी वाट पाहतो. पण त्या बातम्या काय असतील याच अंदाज बांधणे मात्र कठीण नाही...

सरकारी, निमसरकारी, खाजगी आणि एनजीऑ सर्वांचे आपापले कार्यक्रम असतात. त्यांच्या पानोपानी नि पानभर बातम्या. बाजूला पानाफुलांची नक्षी.

एका कार्यक्रमात पर्यावरणाचा फील यावा म्हणून सजावटीसाठी पानेफुले वापरली होतॊ. कित्येक झाडांच्या फांद्या तोडून तिथे नैसर्गिक भासणारी सजावट केली गेली. काही ठिकाणी जंगलाचा फील देणारे डेकॉर होते. तिथे दोन मोठी झाडे उपटून प्रवेशद्वारी लावली होती. या कार्यक्रमाचे आमंत्रणही खास आयात केलेल्या गुळगुळीत पेपरावर छापले होते. एके ठिकाणी तर लवंगी फटाक्यांची हजारांची माळ लावून दिवसाची धुमधडाक्यात सुरूवात झाली. प्रमुख पाहुणे आले तसा अॅटमबॉबच्या धूमधडाक्याने आसमंत दणाणून गेला. मग एनजीओ कसे मागे राहतील? फटाक्यांनी प्रदूषण केले गेले याचा निषेध म्हणून त्यांनी ठिकठिकाणी झाडे तोडून त्यांची होळी पेटवली. काही झाडे गेली पण निषेध नोंदवला जाणॆ महत्त्वाचे. काही ठिकाणी कार्यक्रमांनंतर तोरणे आणि पानाफुलांचा कचरा साफ न केल्यामुळे ही टीका झाली. दिवसभरातील कार्यक्रमात कार्यकर्ते थकतात. त्यांच्याकडून अजून ही साफसफाईची अपेक्षा करणे म्हणजे फार झाले. पण टीका करणे हा आमचा छंदच झाला आहे. एके ठिकाणी एक स्नेह मेळावा झाला. लोक आपापल्या एसी गाड्यांतून आले. भाषणाबिषणांना फाटा देत एकमेकांशी ग्लोबल वॉर्मिंगवर गरमागरम चर्चा झाली. मग सामिष नि निरामिष जेवणावर ताव मारून लोक आपापल्या एसी गाड्यांतूनच घरोघरी परतले. एवढ्या गंभीर कार्यक्रमानंतरही जेवणात किती किलो चिकन नि मटन लागले यावरच पेपरात चर्चा झाली. काहींनी हा दिवस वॉटरपार्क मध्ये साजरा केला. वाहत्या पाण्यात खेळता खेळता आपल्या मुलांना पाण्याच्या बचतीचे महत्त्व हसत खेळत समजून सांगितले गेले. जलपरिषदेची पण बैठक झाली. त्यात मंचावरच्या सर्व मान्यवरांसमोर बिस्लेरीच्या बाटल्यांची सोय होती. हा कार्यक्रम ही 'बॉटल्ड वॉटर मेकर्स असोसिएशन' ने प्रायिजित केला होता. एके ठिकाणी ध्वनीप्रदूषणाविरूद्ध मोर्चा निघाला. लाऊडस्पीकरवरून ध्वनीप्रदूषणा विरूद्ध जोरदार घोषणाबाजी झाली. लोकांचा अवेरनेस वाढावा म्हणून लाऊड स्पीकरवरूनच भाषणे झाली. थोडा आवाज झाला असेल पण लोकांत जागरूकता होणे महत्त्वाचे. त्यामुळे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी लाऊडस्पीकरवर हिंदी सिनेमातील गाणीही लावली गेली.

एवढी जागरुकता पाहून मन कसे भरून येते. हे वाचता वाचता अर्धा तास कसा निघून जाईल कळणार ही नाही. मी तो वाहणारा नळ घाईघाईत बंद करेन.

*****

पर्यावरण दिन म्हटले की माझ्या अंगात हिरवा रंग संचारतो. मी मुद्दाम हिरवा शर्ट घालतो. नि हिरवा रूमाल नि मोजे ही हिरवेच घालतो. हिरव्या भाज्याच खायच्या नि कबाब ही हराभराच हवा. चिकन विथ ग्रीन करी, किंवा हिरवी चटणी असे सेलिब्रेशन करायचे की पर्यावरणाचे रक्षण होते हे मला ठाऊक आहे. म्हणून मग आज तरी दात घासताना मी नळ बंद ठेवीन, अंघोळीला पाणी जास्त वापरणार नाही. आमच्या बिल्डिंगीतली झाडे तोडायचा निर्णय आजतरी घेणार नाही. असे काही काही मी ठरवले. झाडे दिवसा कार्बन डाय ऑक्साईड वापरून प्राणवायू सोडतात म्हणे. मला जमले तर मी ही तसाच प्राणवायू सोडून हवा शुद्ध करायचा विचार करीन. आज तरी कचरा कचरा पेटीतच टाकीन. माझ्या बायकोला या सर्वात जास्त रस नाही. तरी तिला सकाळी सकाळी मी या दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले. जागतिक पर्यावरण दिन म्हणजे तिला कळले नसावे म्हणून म्हटले, 'आज वर्ल्ड एनव्हिरिन्मेंट डे आहे.' आज कुठला तरी डे आहे हे तिला कळले आणि ती खूश झाली. 'डे' म्हणजे सेलिब्रेशन एवढे समीकरण तिच्या डोक्यात फिक्स आहे म्हणून. रात्री जेवायला बसलो तशी ती म्हणाली, 'आज जेवायला काय आहे ओळखा पाहू?' मला ओळखता येत नाही पाहून ती म्हणाली, 'सोप्पंय, तुमचे आवडते कैरी घातलेले वरण !' मला काही समजेना. 'आज तो काही तरी वरण दिवस आहे म्हणालात ना तुम्ही? म्हणून केलेय मी खास.' मी डोक्यावर हात मारून घेतला. ही इंग्रजी मिडीयम मध्ये शिकलेली. तिला 'पर्यावरण' सारखे शब्द न कळणे स्वाभाविक आहे. शेवटी पर्यावरणाला सोपा शब्द शोधला नाही तर पर्यावरणाचे काही खरे नाही हे मात्र खरे.

१४

## करमणूक 'कर'मणूक

मध्यंतरी सरकारने सेवाकर लावला आणि आपण करतो ते सर्व सेवाकार्य आहे हे आपल्याला नव्याने जाणवले. कोळ्याने जाळे टाकावे तसे हे सेवा कराचे जाळे टाकून सरकारने मासेमारी चालू केली. आता सगळीकडे सर्व जण सेवाच सेवा करताना दिसू लागले आहेत. नव-यासाठी बायकोने चहा करून समोर आदळला, जेवण समोर ठेऊन 'गिळा' म्हणाली किंवा नव-याने घरातील काडी इकडची तिकडे केली तरी 'झाली सेवा, भरा आता कर' असे होऊ लागले. सेवा कर भरावा लागेल या भीतीने मुलांनी आईबापांची सेवा करणे हल्ली बंद केले आहे.

सरकारी यंत्रणा नावाची एक अमूर्त गोष्ट असते. ती एखाद्या अजगरासारखी सुस्त असते. एकदा कर लावला की आपले खाद्य गिळत पचवत बसते, नि परत भूक लागली की नव्या गोष्टींवर नवे कर लावायला तयार होते. सेवा कर लावला, नंतर तो वाढवला, नंतर सेवाही परम धर्म असा संदेश देत सर्व काही गोष्टींना सेवा म्हणून जाहीर केले, लोक आधी कुडकुडली पण न कर भरता सांगतात कोणाला. भरपूर कर गिळून सरकारी यंत्रणा पोट भरून सुस्त झाली आहे. ते खाद्य पचवत आहे. जेव्हा या अजगराला जाग येईल तेव्हा काय? आणखी कशावर कर लावेल? आणि कर तर लावावाच लागेल कारण जास्त वेळ हा अजगर भुकेला राहात नाही.

माझा एक मित्र आहे जमदग्नी करकरे नावाचा. तो करसल्लागार आहे. त्याची स्वत:ची 'कर आहे म्हणून डर आहे' अशी टॅग लाईन असलेली 'कराग्र' नावाची कंपनी आहे. हा माझा मित्र अत्यंत गंभीर आहे. कधीही न हसण्याचा विश्वविक्रम त्याच्या नावावर आहे. लहानपणीच्या गोष्टीत एक न हसणारी राजकन्या असायची, ती राजकन्याच बहुधा या जन्मी जमदग्नीच्या अवतारात आली असावी.

त्याला मी नवीन कराबद्दल विचारले तर तो गंभीर चेह-याने म्हणाला, 'साधी सोपी गोष्ट आहे, या पुढे सर्व गोष्टींवर करमणूक कर लागेल बघ.'

मी म्हटले. 'काहीतरीच काय.'

तर तो म्हणाला, 'मग बघच तू.'

विचार केला तर मला त्याचे पटायला लागले. आपला देशच आज करमणूक प्रधान आहे.

काही देश उद्योग प्रधान असतात, काही वर्षांपूर्वी आपला देश शेतीप्रधान होता. पण तसा आज तो नाही. आज आपला देश करमणूक प्रधान आहे.

इथे सर्व जण एकमेकांची करमणूक करायसाठी झटत असतात.

कोणी ना कोणी इथे भांडत असतात आणि ऐकणारे नि पाहणारे धन्य होऊन आपली करमणूक करून घेत असतात.

इतरांचा वेळ चांगला जावा म्हणून इथे रस्तोरस्ती भांडणाचे शोज उत्स्फूर्तपणे होत असतात.

जाता जाता एकाचा धक्का दुस-याला लागला तर पहिला 'सॉरी' म्हणून संपवू पाहात असेल तर दुसरा पुढाकार घेतो, 'सॉरी बोला तो हो गया क्या? अंधा है? दिखता नही? आंखे फुट गयों तेरी?'

इथून पुढे नाट्यास सुरूवात होते.

अचूक शब्दयोजना, मधे मधे हातवारे आणि परफेक्ट बॉडी लॅंग्वेज या जोरावर शो हिट होतो आणि भरपूर टीआरपी मिळवून जातो. बघणारे धन्य होतात,

काही वेळाने पुरेसे नाट्य झाले आणि पुरेसे मनोरंजन करून झाले की लोक निघतात फक्त जाता जाता टाळया तेवढ्या वाजवत नाहीत.

'विदाऊट टिकिट फुल्ल टाईम पास' झाला म्हणून आनंदून पुढे निघतात.

लोकल ट्रेन मध्ये ही भरगर्दीत असे शोज होतात.

कुणी कुणाच्या पावलावर पाऊल टाकतो. एरव्ही मोठ्या माणसांच्या पावलावर पाऊल टाकून पुढे जायची आपल्याला शिकवणूक पण ट्रेनच्या लटकंतीत हे चालत नाही. मागील पिढ्यांचा उद्धार होतो. बाचा बाची होते,

एवढ्या गर्दीत लोकांचे मनोरंजन करायचे ब्रीद कोणी सोडत नाही. बाकीचे आपला दहा पंधरा मिनिटांचा वेळ चांगला गेला म्हणून सर्व आनंदतात.

घरोघरी पण हीच कथा.

सासू सुनेला किंवा सून सासूला टोचत राहाते. मग त्या सर्वांचा उद्रेक होतो.

शेजारी पाजारी कामधाम सोडून कान देऊन ऐकतात. निखळ मनोरंजनाच्या चार घटका सरल्या की कामाला लागतात.

त्या शेजारच्या घरात ही असेच असते पण ते विसरून मग त्या घरातील बाई सर्वांना 'त्या घाटपांडेचे ऐकले का' अशी नांदी करून सर्वांना कानावर पडलेले भांडण ऐकवतात. मग सांगणारीचेही मनोरंजन नि ऐकणारीही धन्य.

अशी करमणूक नसानसातून म्हणण्यापेक्षा पाइपा पाइपातून घरोघरी खेळत असते.

याहीपुढे तर थेट आपली महापालिका, विधानसभा, लोकसभा सभागृहे आहेत.

आपण निवडून दिलेले प्रतिनिधी आपली मनोरंजनाची जबाबदारी ज्या इमानेइतबारे पार पाडत असतात त्याला तोड नाही.

तिथे बोलताना त्यांच्या जिभांवर सरस्वती तांडव नृत्य करते.

त्या सर्वास जोड, ॲक्शन म्हणून तोडफोड, मारधाड होते. थकून भागून सभात्याग होतो. या दर्जाचे मनोरंजन कुठेच होणे शक्य नाही.

निवडणूका आल्या तर बातच नको.

सर्वच पक्ष जाहीरनामा नावाचे विनोदी पुस्तक काढतात. त्यामुळे ज्याच्याकडून जास्तीत जास्त करमणूक होईल तो जिंकून येतो.

आणि सत्तेवर आल्यावर जाहीरनाम्यातून लोकांना कसे फसवले असे लहान मुलांसारखे टाळया पिटीत सांगत वाकुल्या दाखवतो.

मग लोक पण आपण कसे फसलो समजून स्वत:वरच हसतात.

अशी करमणूक म्हणजे राजकारण्यांचा नेहमीचा खेळ आहे आणि लोकांना तो खूपच आवडतो.

सर्व सृष्टी व्यापून दशांगुळे उरणा-या भगवंतासारखा टीव्ही आपल्या जीवनात सर्वव्यापी आहे. तो तर बनलाच करमणूकीसाठी आहे.

त्यामुळे नावातच 'हसला ग बाई हसला', 'फिदी फिदी एक्सप्रेस', 'फुकट फाकट हशा', 'काका मला हसवा', 'हसतील त्यांच्या कवळया दिसतील' अशा नावाचे कार्यक्रम बनतात ज्यामुळे लोकांना हे हसवण्याचे कार्यक्रम हे कळते.

त्यातही हे काम सोपे करायला रेकॉर्डेड हशे मागे टाकले जातात. म्हणजे कोठे हसायचे याचा पण क्ल्यू लोकांना मिळून जातो.

तशात या जर कॉम्पिटीशन असतील तर यातील परिक्षकांना मोठमोठ्याने हसायचे ट्रेनिंग दिलेले असते त्यामुळे पण आपण कुठे हसायचे हे कळते.

सदाबहार सिरियल्स मध्ये हीरो हीरविणीला पट्ट्याने मारतो नाहीतर सासू सुनेला टोचत असते, कधी तिला मारायचे, जाळायचे प्लॅन बनवते.

बाकीचा महिला वर्ग एकदुसरीबद्दल पाठीमागून गॉसिप करतो. या सर्वांतून इतर सर्वांची उच्च दर्जाची करमणूक होत असते.

चोवीस तास न्यूज नावची एंटरटेन्मेंट चॅनेल्स आहेत. कोठे खून होवो, अपघात होवो, डाके-दरोडे पडोत, कोणा नट नट्यांचे दुसरे तिसरे लग्न होवो किंवा दुसरा तिसरा डायवोर्स होवो, कोणाचा वाढदिवस असो की कोणाचे मरण असो सारख्याच उत्साहाने माईकची आइस्क्रीमसारखी दिसणारी बोंडके घेऊन 'अब आपको कैसा लगता है' विचारत ते फिरत असतात.

त्या काळी टीव्ही असता आणि अशी न्यूज चॅनल्स असती तर रावणाला युद्धभूमीवर खाली पडता पडता पण यांनी हाच प्रश्न विचारला असता.

आणि पाठोपाठ 'अयोध्या के हीरो श्रीराम' यांची एक्स्ल्युझिव्ह मुलाखत आली असती.

टीआरपी नावाच्या टारगेट साठी हे सर्वांचे मनोरंजन करत असतात.

कधी काही मजेदार होत नसेल तर नवीन काही घडवून लोकांची मनोरंजन भूक भागवण्याची ब्रेकिंग नाहीतर मेकिंग न्यूज म्हणून जबाबदारी पार पाडतात.

त्यापुढे जाऊन सिनेमा, यात सर्व लार्जर दॅन लाईफ.

त्यामुळे त्यात हीरो पायाला चाके लावून फिरतो, पंखांशिवाय उडतो कारण गुरूत्वाकर्षणाचे नियम या हीरोस लागू होत नाहीत.

तो चंद्रावर जाऊन येऊन असतो. परग्रहावरील मुलींनाही पटवण्याची कला त्याला अवगत असते.

याच्या घरी चहा पण बादली एवढ्या कपातून पितात आणि त्याच्या घरी मारी बिस्किटे एखाद्या मोठ्या ताटली एवढी असतात.

त्यांच्या दाराशी कुत्रा नसून कोल्हा बांधलेला असतो आणि घरात मांजरी ऐवजी वाघोबा फिरत असतो. यांच्या घरातल्या भिंतींवर पाल न फिरता मगरी फिरतात.

गुरूत्वाकर्षणाचे नियम या हीरोस लागू होत नाहीत त्यामुळे तो कुठल्याही उंचीवरून पडला तरी त्याला काही होत नाही.

कोणी कितीही मारले तरी त्याला खरचटत नाही. त्याने फायटिंग करून एकावेळी दहा वीस लोकांना मारले की लोक टाळ्या पिटतात.

कर भरूनही अशा मनोरंजनासाठी आतुरलेले असतात.

व्हिडीओ नि कॉम्प्युटर गेम्स, कार्टून चॅनल्स यांनी लहान लहान मुलांचे मनोरंजन करून प्रभूशी नाते जडवले आहे.

लहान मुले बोलण्याच्याही आधी मोबाईल हातात घेतात आणि त्यातील खेळातून व्यायाम करतात.

एकूण काय सगळीकडे नुसता मनोरंजनाचा आणि करमणुकीचा बोलबाला आहे.

सरकारी अजगरी यंत्रणेने आजपर्यंत फक्त सिनेमावर कर लावला आहे आणि बाकी मनोरंजन त्या नजरेतून निसटले आहे. उद्या एकाने दुस-यास हसवले की भरा कर, किंवा दोघांनी मिळून तिस-याचे मनोरंजन केले तर भरा कर असे होणार आहे. लोक मनोरंजनातून वेळ काढून करमणूक कर भरण्याच्या लाईनीत उभे राहाणार आहेत. नाहीतरी टॅक्स आणि मृत्यू या दोनच शाश्वत गोष्टी या जगात आहेत असे कोणीतरी म्हटले आहेच.

बाकी काही असो शेवटी जमदग्नी मात्र नशिबवान. त्याला हसवणारा अजून जन्माला यायचा आहे. त्याला काय, ना मनोरंजन ना हसणे नि ना मनोरंजन कर भरणे. तो फक्त सर्वांना कर भरायचा सल्ला देईल आणि स्वत: नामानिराळा राहिल.

१५

## क्रांती krnty उत्क्रांती :

मध्यंतरी आपल्या देशात एक सुपरफास्ट मिनी क्रांती झाली. मोठ्या लोकांचे कोटींचे घोटाळे जाहीर झाले आणि सर्वसामान्यांना वैषम्य वाटायला लागले. कुणी शिपाई शें मध्ये तर कारकून हजारांत वरकमाई करतो, अगदीच कोणी एखादा भाग्यवात लाखांत खेळतो. आम्हीच नतद्रष्ट, थू त्या जिंदगानीवर असे सर्वांना एकावेळीच वाटले. कुणी त्याला मास हिप्नोसिस म्हणाले तरी ती एक क्रांतीच होती. हे मंत्री संत्री कोण लागून गेलेत की आम्ही हजारांत समाधान मानावे आणि त्यांनी कोटी कोटी उड्डाणे घ्यावी? सर्वांनाच एकाच वेळी इतरांच्या भ्रष्टाचाराचा तिटकारा येऊ लागला.लोकांचा संताप संताप झाला. अगदी तिळपापडच म्हणाना. मग तीन चार दिवस मोर्चे झाले, झेंडे घेऊन फिरणे झाले, निषेधसभा झाल्या. मेणबत्त्या लाऊन झाल्या, टोपी घालून फिरणे झाले. टोपी न घालणाऱ्याकडे लोकं जणू कोणी 'भ्रष्टाकार' केला अशा नजरेने पाहू लागले. त्या टोपीची डिमांड एवढी वाढली की ती टोपीही काळ्याबाजारात मिळायला लागली. लोकांनी ती हौशेनी चढ्या भावात घेऊन आपली निष्टा सिद्ध केली. भ्रष्टाचाराविरोधात एवढे सारे केले म्हणून प्रत्येक जण कृतार्थ झाला. देशात एक नवीनच थ्रिल लोकांना मिळाले. आजपर्यंत असा अनुभव कोणाला मिळाला नव्हता. ती झिंगच वेगळी. आपण क्रांतिवीर आहोत असा अभिमान सर्वांना वाटू लागला. ४-५ दिवसांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर सर्वांना आपल्या कर्तव्याची आठवण झाली. जो तो परत आपल्या कामाला लागला.

*****

त्याउलट गांधीजींनी स्वातंत्र्यलढा उभारायला वर्षानुवर्ष घेतली. परत साध्य नि साधनावर सर्वांना लेक्चरे फुकट दिली. लोकांना हे मात्र पटले की हा कॉणी महात्मा आहे. कदाचित देवाचा अवतारही असू शकतो. मग लगेच त्याला रितसर देव्हाऱ्यात बसवून पूजा करणे आले. देवांच्या शिकवणुकीला पाळून देवालाच आव्हान देण्याइतके आम्ही नतद्रष्ट नाही, नास्तिक तर नाहीच नाही. त्यांना देव न मानणाऱ्या बाकीच्यांनी त्यांना दानवाचा अवतार मानले, त्यामुळे त्यांनाही अनुकरणाची गरज भासली नाही. मग आम्ही त्यांना सरकारी भिंतीवरच्या फोटोत आणि १००-५०० च्या नोटेवर स्थान दिले. सुभाषचंद्रांनी सशस्त्र सेना उभारायला किती वेळ घेतला. अशी दिरंगाई आजच्या फास्ट जमान्यात आम्हाला खपत नाही. आम्ही झटपट क्रांती करून मोकळे झालो. त्या आधीच्या क्रांत्यांचा सुपरस्लो स्पीड पाहूनच गोरासाहेब ही वैतागून निघून गेला. आणि देश स्वतंत्र झाला तो आपल्या मुळे असे नेत्यांना वाटू लागले.

आमच्या देशाला क्रांती तशी नवीन नाही. हिरवी, पांढरी क्रांती आम्ही पाहिली, काहींनी लाल क्रांती करायचा प्रयत्न केला. पण अशा वेगवेगळया रंगाच्या क्रांतीत ती गंमत नव्हती. म्हणजे त्या फारच सिरीयस क्रांत्या होत्या. नाही म्हणायला आणीबाणीत नंतर काही महिने क्रांती झाल्याचे सर्वांनी अनुभवले होते. पण ते तेव्हा, तेव्हा ना फेसबुक होते ना ट्विटर. बातम्या पण रेडिओवरच्या, त्यामुळे त्यात ही थ्रिल नव्हते. कॉम्पुटर नि टीव्हीने खरी क्रांतीची गंमत आणली. इंटरनेटवर आजच्या जनरेशन ने खूप सारे गेम्स खेळले आहेत. जगाशी नेहमीच कनेक्टेड राहणाऱ्या पण स्वत:ला मात्र ४ भिंतींत कॉम्प समोर कोंडून घेणाऱ्या आजच्या जनरेशन ने इराक की इराण मधली धमाल रिव्होल्युशन लाइव्ह पाहिली आणि असाच काहीतरी थ्रिलींग गेम खेळण्याचे मनावर घेतले. कुणीतरी मग फेसबुकवर स्टॅटस अपडेट केले. भ्रष्टाचारच्या नावाने बोंब ठोकली. त्याला थोड्याच वेळात २६५७८ लाइक्स मिळाल्या आणि क्रांतिच्या गेमला सुरूवात झाली. कोणी ट्विटरवर चिवचिवाट करू लागले. कमेंटसचा पाऊस पडू लागला. एसेमेसवर एसेमेस जाऊ लागले. हा गेम सर्वांनाच आवडला. ‘I support’, ‘me too’, ‘I do’ किंवा नुसत्याच स्मायली अशा संक्षिप्त प्रतिक्रियां पासून डिटेल मधे चिरफाड करणाऱ्या संतप्त प्रतिक्रियांनी इनबॉक्सेस भरले. कुणी इंग्रजी मराठीत लिहिले, ‘maza hya krnty laa suport’. थोडक्यात क्रांती krnty बनून अवतरली. तीन चार दिवसांच्या फेसबुक आणि ट्विटरवरच्या लढाईने क्रांती झाली. शेवटी कुणीतरी परत लिहिले ‘brd of dis krnty game, ple sumthin els.’ फेसबुकावर पण अशीच काहीतरी नोट आली. तिला पण भरपूर लाइक्स मिळाले. आणि क्रांती संपली.चार दिवसांच्या त्या गेमची आठवण नेटकर अजून ही काढताना दिसतात.

*****

खरीखुरी लॉंगटर्म म्हणावी अशी क्रांती झाली ती इंटरनेट, कॉम्प्युटर, मोबाईल आणि टीव्ही ने.

इंटरनेटने तर सर्वांना खेळाची आवड लावली. मैदानी खेळ सर्वांना प्यारे झाले. बोटाच्या एका हालचालीवर क्रिकेट आणि फुटबॉल सर्व खेळायला लागले. गोवर्धन पर्वत कृष्णाने एका बोटावर उचलला म्हणून एका बोटाचा व्यायाम माऊसवर करून त्याची ताकद वाढवायचे प्रयत्न सुरू झाले. शहरांत मैदानांची कमतरता. पण इथे मैदानांत न जाताच मैदानी खेळ खेळायची सोय झाली. आता मैदानांची गरज नाही म्हणून मोकळया जागा भरण्यात तरबेज राजकारण्यांनी लगेच ती ताब्यात घेतली आणि अनेक समाजोपयोगी कामे सुरू केली. तिथे कित्येकांची निवाऱ्याची सोय कुठे झोपड्या तर कुठे टोलेजंग इमारती बांधून करण्यात आली. थोडक्यात सगळीकडे नुसता आनंदी आनंद झाला.

आता तर कित्येक मुले ह्या आभासी दुनियेतच राहायला गेली आहेत. आता शाळेत न जाताच शाळेचा आभास निर्माण व्हायची शक्यता आहे. आभासी क्लासरूम मधे अभ्यासही आभासी व्हायची शक्यता आहे. एकूणच virtual क्रांतीचा आभास निर्माण झाला

आहे. कित्येक तरूण तर ही दुनिया 'तबाह' करायला येणाऱ्या दुष्टांचे आभासी निर्दालन करण्याचे आभासी काम गेम्समधून करत आहेत. काही मोठ्या मोठ्या रेसेस खेळत आहेत किंवा विमाने virtual आकाशात उडवत आहेत. काही चोरपोलिसांचा गेम खेळत आहेत, फक्त फरक इतकाच की पूर्वी मुलांना पोलिस व्हायला आवडत असे आता ह्या गेम्स मधे ते आभासी का होईना चोर होऊन पोलिसांना फसवण्यात धन्यता मानू लागले आहेत.

कल्पना करा की एखादा मकरंद, नाही, मॅक नावाचा तरूण ( हा मात्र खरा, आभासी नव्हे ) virtual वर्ल्ड मधे जगतो आहे. सकाळी ११ वाजता त्याची पहाट होते, कारण रात्री २-३ पर्यंत गेम्स आणि इतर अॅक्टीव्हीटीस चालतात. आपल्या स्पेशल reclining chair वर तो जागा होतो. त्याची स्वत:ची स्पेशल केबिन आहे त्यात वॉटरप्रूफ कॉम्प्युटर आणि की बोर्ड आहे. नवीन स्पेश्यल खुर्ची आहे तिच्यात एखाद्या कमोड सारखी रचना आहे, वर एक अंघोळी साठी शॉवर आहे, त्या केबिनची स्वतंत्र ड्रेनेज व्यवस्था आहे. बाजूच्या बेसिन मधे पाणी आहे. एका छोट्या खिडकीतून जेवण आत पाठवण्याची सोय आहे. दिवसरात्र त्या खुर्चीवरून उठायला लागू नये अशा सर्व सोयी आहेत. मॅक सकाळी उठला की त्याचा कॉम्प ऑन करतो, मेल चेक करतो, त्याच्या virtual फ्रेंडस चे मेसेजेस पाहतो. केबिनमधल्या बेसिन मधे दात घासून आपल्या कमोडचेअर मध्ये देहधर्म पार पाडता पाडता त्याची ही कामे होतात. मग तो बेल वाजवतो तसा त्याचा ब्रेकफास्ट खिडकीतून आत सरकतो. आज तो जपानमध्ये असता तर त्याने भरवण्यासाठी एखादा रोबो पण install केला असता, त्यामुळे आपल्या मागास देशाचे त्याला कमालीचे वैषम्य वाटते. मग ऑन लाईन नोकरीचे काम. त्यात सवड काढून गेम्स, मेसेजेस, फेसबुक, ट्वीटर वगैरे. आता दिवसभर अशी कामे करायची तर एनर्जी पाहिजे म्हणून तो खुर्चीवरून उठून आपली शक्ती वाया घालवत नाही. उद्या ह्याची खरीखुरी बायको हरवली तरी हा गुगल सर्च करील, आणि एखाद्याचा मृत्यू झाल्याची बातमी ऐकली तर 'Don, t bother, there are 3 lives' अशी गेम्सची भाषा करेल. त्याला सर्वात प्यारी कोणती गोष्ट असेल तर त्याची खुर्ची जिच्या साठी त्याने insurance पॉलिसी घेतली आहे. अशी ही virtual क्रांती चोहिकडे व्हायच्या मार्गावर आहे.

टीव्ही इंडस्ट्री ही रोजगार हमी योजनेचा भाग आहे. एक चॅनेल त्यावर १० मालिका त्यासाठी दिवसरात्र काम करणारे नट, नट्या आणि इतर वगैरे कामाठी. एका मालिकेसाठी दीड दोनशेंना रोजगाराची हमी. ही एका चॅनेलच्या एका १५ मिनिटांच्या दैनंदिन मालिकेची गोष्ट असेल तर शेकडो वाहिन्यांवरच्या शेकडो मालिकांनी किती रोजगार निर्मिती केली असेल? एखाद्या पक्षाच्या जाहीरनाम्यात रोजगार निर्मिती साठी आम्ही नवनवीन चॅनेले काढू असे आश्वासन लवकरच दिसायची शक्यता आहे. त्यापुढे जाऊन करमणूक प्रधान न्यूज चॅनेल्स आहेत. त्यातील बातम्या खऱ्या की खोट्या हे दुसऱ्या दिवशी

पेपरात वाचून कन्फर्म करावे लागते. त्यातील बातम्यांच्या करमणूक क्षमतेवर ती चालतात. त्यांच्या स्टुडिओत एक्स्पर्ट नावाची जमात येऊन जाऊन असते. असे टिव्ही एक्स्पर्ट तयार करण्याचे ही कोर्सेस सुरू व्हायची शक्यता आहे. त्याशिवाय 'आस्था', 'संस्कार' वगैरे अध्यात्मिक भूक आणि 'फूड फूड' सारखी खरीखुरी भूक भागवणारी चॅनेले आहेतच. काही चॅनेलवर तर एखाद वर्षापूर्वी जगबुडी होऊन सर्व नष्ट होण्यावी बातमी आली होती. आज दुनिया ही आहे आणि ती चॅनेल्स ही तगून आहेत. ब्रेकिंग न्यूज ही तर न्यूजचॅनेलांची आवडती ॲक्टीव्हीटी. काही जण त्यापुढे जाऊन मेकिंग न्यूज ही करायला लागले. टिव्ही आज सर्व विश्व व्यापून दंशांगुळे उरला आहे.

आणि मोबाईलचे काय? ती तर आधीच मर्कट सारखी अवस्था आहे. त्याच्यात गेम्स आहेत, टिव्ही आहे, मिनी का होईना कॉम्प्युटर आहे. त्यामुळे तरूण पिढी आपल्या आई बापापेक्षा जास्त प्रेम मोबाईलवर करतात. त्याचे एयरफोन लावून स्वर्ग सुखाचा आनंद मिळवतात. त्यासाठी प्राणाची बाजी लावून रस्त्यातच काय तर रेल्वे रूळांवरही चालायला ही ते तयार असतात. अशी जिवावर उदार होणारी पिढी ज्या देशात आहे त्या देशाचे भविष्य कसे असेल ते सांगायला नकोच.

टीव्ही, कॉम्प्युटर आणि मोबाईल घेऊन बसणारी जनता यामुळे आधीचा homo erectus नावाचा मनुष्यप्राणी हळू हळू उत्कांत होत बैठा प्राणी व्हायची शक्यता आहे. असो, शेवटी बदलच या जगाचा स्थायी भाव आहे.

१६

## त्यांची ( रड ) कथाच वेगळी  अर्थात : रडकथा २०१६, एक trilogy

१.

मालन ताई सकाळी उठतात तो त्यांना आपल्यावरच दया येते. एयरकंडीशंनर रात्र भर सुरू होता तो सकाळी जरा आवाज करायला लागतो. त्यामुळे त्या आवाजाने त्यांची झोप मोड झाली म्हणून त्या चिडतात. आठ वाजले आता उठायचे म्हणून उठतात. बाहेर उकाडा खूप. आतील एसीमुळे तो एरवी जाणवत नाही. पण किचन काही एसी होत नाही. मालन बाईंनी कामासाठी पाच बायकांची फौज नेमली होती. त्यातील पहिल्या दोन घरची कामे निपटायच्या, तिसरी स्टँडबाय, कोणी आले नाहीतर कामे करणार, चौथी या तिघांवर नजर ठेवणार, तर पाचवी चौथी नजर ठेवते की नाही यावर नजर ठेवणार ! आज सकाळी सकाळी त्या हायरार्कीतील चार नि पाच येणार नव्हत्या त्यामुळे मालनबाईंना स्वत:च सर्व देखरेख ठेवायची म्हणजे कामाचा लोड खूपच होता त्यांच्यावर. त्यात परत किचन मध्ये एसी देखील नाही. तिकडच्या उकाड्याने त्या बेजार झाल्या.

दुपारच्या किटी पार्टीत त्यांच्या मैत्रीणी गोळा झाल्या.

‘धिज कामवालीस यु नो, आर सो अनरिलायबल. आज सकाळी थ्री ऑफ देम डीडंट टर्न अप यु नो.‘

‘मग काय ? भजन? ऑर डिवोशनल सॉंग ? विठ्ठल विठ्ठल ?‘

‘यस. जय जय राम कृष्ण हरी नि दुसरे काय? इट्स सो हॉट नाही ? किचन मध्ये एसी लावू म्हटले मी अशोकला तर तो ऎकत नाही.‘

‘अगं बरंय. या बायका लावून बसायच्या. आपण बसू तिकडॆ बेडरूम मध्ये आपल्या कामवाल्या खातात एसी ची हवा.‘

‘हो ना. हे खरंय. हे माझ्या माईंड मध्ये आलंच नव्हते. आणि या बायकांचे पगार पण काय वाढलेत? आमच्या पाच नंबरला चांगली दोनशे रूपयांची वाढ पाहिजे.‘

आपल्या वॉर्ड्रोबातून नव्या ड्रेसेस नि साड्या काढत मालन बाई म्हणाल्या.

‘काय बाई महागाई झाली आहे, साध्या सिल्क साड्या घेतल्या त्या ही आठ हजारात. दहा हजार तर यावेळी नुसता हिऱ्यांच्या रिंगवर खर्च झाला. त्यात परत या बायकांना पगारवाढ हवी. फारच डोक्यावर चढून बसल्या आहेत.‘

मालनबाईंचे हे असेच. बिचाऱ्या घरी बसून असतात. कामे करवून घ्या, सगळयांवर लक्ष ठेवा, दुपारी मैत्रिणींबरोबर पत्ते नि गप्प्पा. संध्याकाळी क्लबात. रात्रीपर्यंत दमून जायच्या. जेवण मोजकेच घ्यायच्या. म्हणजे चीज सॅंडविच नाहीतर चिकन सॅंडविच नाश्त्याला नि जेवायला पुरणपोळींवर किंवा श्रीखंडपुरीवर गुजराण करायच्या बिचाऱ्या. मग वजन कमी करायला जिम मध्ये फी भरून जायच्या.

'फीटनेस इज मस्ट' हा त्यांचा मंत्र होता. मग जिम मधल्या व्यायामानंतर भूक लागली की काहीतरी वडा समोसा किंवा बर्गर खाऊन घ्यायच्या. आपल्या बिचारेपणावरच त्यांना खूप दया यायची. आपले वजन कितीही मेहनतीनंतर कमी का होत नाही याचे त्यांना आश्चर्य वाटायचे.

हे मेले जिम वाले नुसते पैसे घेतात, वजन काही कमी होत नाही. आपले, त्या हताश होऊन जिमबाहेरच्या कॅंटीनमध्ये चिकन टॉपिंगचा पिझ्झा खाताना मनाशीच म्हणतात.

धिस इंडिया इज एकदम धिस, म्हणजे कोणालाही अकांटिबिलिटी नाही इथे, त्या नेहमी आपल्या मैत्रिणींना सांगत असतात.

२.


संपतराव सांगले म्हणजे एक मोठे नेते. महाराष्ट्राची आशा असे त्यांना समजले जाई ते फार पूर्वी पासूनच, त्यांच्यावर राज्याची जबाबदारी येणार याचा अंदाज जनतेला आला होता. त्या प्रमाणे त्यांच्याकडे नेतृत्व आलेच. पण स्वत: संपतरावांचा मात्र या सत्तेत जीव रमत नाही. दररोज उठून राजकारण आणि समाजकारण. जीव नुसता उबून जातो. ना कुठे स्वतंत्र आयुष्य. राज्य एवढे मोठे, त्यात परत विरोधक टपलेले. डोळयाला डोळा लागत नाही दिवसेंदिवस. खुर्ची कधी खालून ओढली जाईल याचा भरवसा नाही. उद्या सत्ता गेली तर आपल्या हाती काय ? नोकरदारांचे एक बरे असते संध्याकाळी घरी यायचे सकाळी उठून कामावर जायचे. नोकरी जायची पर्वा नाही नि पगार बंद पडायची चिंता नाही. आपल्या पाच वर्षात काय काय करणार? पुन्हा निवडणूक जिंकायची म्हणजे त्यासाठी बेगमी आलीच. परत घरी बसायला लागले तर रिटायरमेंटची सोय ही त्यातच पहायची. पाचच वर्षांत एवढे सारे करायचे म्हणजे मेहनत किती? एक दिवस सुखाने झोपता आले तर शपथ.

परत वेळ झाला तर जनकल्याणाचा पण विचार करायचा म्हणजे तर अतिच झाले. एक माणूस काय काय करणार आणि किती ठिकाणी पाहणार ? तरी नवे नेतृत्व म्हणून त्यांचे पुत्र त्यांची गादी सांभाळायला समर्थ होते. पण या दलदलीत त्यांचे कसे व्हायचे ही पण एक चिंता. आपल्या राजकारण्यांना फारच मेहनत करावी लागते त्या मानाने त्याचा मोबदला स्वत;हून मागून घेतल्या वाचून मिळत नाही याची त्यांना खंत फार. परत लोकांचे बारीक लक्ष आपल्याकडे. मागे कुठे अपघात झाला तिकडे भेट द्यायला जायचे म्हणून दुसरी नवीन पॅंट चढवली तर त्याची पण बातमी पेपरात. आधीच्या पॅंटवर आज बोंबलाचा रस्सा सांडला हे काय सर्वांना सांगणार ? सार्वजनिक सार्वजनिक म्हणजे किती असावे? साधी पॅंट पण आपल्याला हवी तेव्हा बदलता येऊ नये? आपल्या लक्झर गाडीतून जाता येता नेहमी त्यांच्या मनात हे विचार येत असतात. ही सत्ता काही आपल्याला सोडत नाही नि आपली यातून आता सुटका नाही याचे त्यांना विलक्षण वैषम्य वाटते. सत्तेत जीव अगदी कसनुसा होऊन जातो. 'या सत्तेत जीव रमत नाही' अगदी ते जाता येता सर्वांना सांगतात, विशेषत: कोणी पेपरवाले पत्रकार किंवा बोंडूक वाले टीव्ही न्यूज वाले आजूबाजूस दिसले तर. नुकतीच त्यांची साठी झाली. कित्येकांची होते तशी. पण त्यांच्या सारख्या नेत्याला साठी म्हणजे खर्च किती. आजकाल होर्डिंग लावायचे तर कठीण आणि पानपान जाहिराती द्यायच्या तर पेपरवाल्यांनी रेट किती वाढवून ठेवलेत? परत दुसऱ्या कोणी ही आपली वाढदिवस पुरवणी देण्याची व्यवस्था करायची, आपली आपण दिली हे कळले तर हसे व्हायचे. किती सगळीकडे बघायचे?

३.

हणमंतराव हल्ली खूपच टेन्शन मध्ये असतात. हणमंतराव लांडगे म्हणजे बडे राजकीय प्रस्थ. झेडपी तून आले नि बघता बघता आपले साम्राज्य उभारून मंत्री झाले. पक्षाला अशाच लोकांची गरज असते जे पक्ष नि पैसा उभारतील. हणमंतरावांनी कामे खूप केली. बरे वाईट काही पाहिले नाही. आजूबाजूस लक्ष दिले नाही. आपला मतदारसंघ बांधला नि व्होट बॅंक उभारली. कोणी त्यास वोटबॅंकेचा स्विस अकाउंट म्हटले त्याची पर्वा केली नाही. हणमंतरावांस मुले दोन. एक मोठा अर्जुनराव. त्यांनी शाळा काही वर्ष केली.

आता मतदारसंघात लक्ष घालतात. हणमंतरावांची रग आणि मग्रूरी त्यांच्यात पुरेपूर उतरली आहे. हणमंतरावांना त्याचा कोण अभिमान. लोकही अर्जुनराव हणमंतरावांची गादी चालवणार हे समजून चालले आहेत. अर्जुनराव आपल्या गाड्या उडवतात. शहरात भटकतात. मनात येईल तसे वागतात. हाताखालील लोक त्यांना टरकून असतात. अगदी गावचे फौजदार देखील. त्यांना हटकायची हिंमत कोणात नाही. उद्या तेच आमदार नि मंत्री होतील नि त्यांना सलाम करायला लागेल याची जाणीव पोलिस अधिकाऱ्याना आहेच. हणमंतरावांना त्यांचा अभिमान आहेच. त्यांची चिंता तर नाहीच. खरी चिंता त्यांना आहे ती आपल्या दुसऱ्या मुलाची. छोटा म्हणजे आता बारावीस पोहोचलेला संग्राम. संग्रामचे लहानपणापासूनच सर्व काही वेगळे. एक तर शाळेची नि अभ्यासाची गोडी. ते एक समजून घेता येईल. असते एकेकाला अभ्यासाची आवड. असे म्हणून हणमंतराव दुर्लक्ष करीत. पण सग्रांमला सर्व म्हणजे हाताखालचे नोकर चाकर पण आपल्या बरोबरीचे वाटत. त्यांच्यात मिळून मिसळून राहायला त्याला आवडे. त्याचे मित्र पण अशाच खालच्या वर्गातले होते. संग्रामला नियमानुसार वागायची आवड. आपल्यासाठी नियम बदलून घ्यायचे कधी मनास शिवत नसे. हणमंतरावांना आपल्या घरी हा नेभळट कसा जन्माला आला असे वैषम्य वाटे. त्यात पुन्हा संग्रामला राजकारणाची नावड. त्याला पुढे डॉक्टर व्हायची इच्छा होती. हणमंतरावांना वाटते की हे सर्व आपल्या लायकीचे नाही. आपण राज्य करणारे. गरज पडली तर आपला डॉक्टर पदरी बाळगू, त्यासाठी हे असे काही करायची गरज काय? नावापुरती नि नावामागे लावण्यापुरती डिग्री कोणीही कुठूनही आणू शकेल त्यासाठी आपल्या आयुष्यातील काही वर्षे या मुलाने बरबाद करावीत? वकील, डॉक्टर आणि कामांसाठी इंजिनियर आपल्या पदरी ठेवायचे सोडून आपण इतरांची सेवा करणारे कोणी व्हावे ही कल्पनाच हणमंतरावांस सहन होत नाही. ते परोपरीने विनवतात संग्रामला, की हा भिकेचा नाद सोडून राजकारणात पडा. आपला सुभा सांभाळा. आम्ही जिवापाड मेहनत करून मिळवलेली आमची प्रतिष्ठा धुळीस मिळवू नका. हणमंतरावांना दिवसेंदिवस झोप लागत नाही. त्यातल्या त्यात अर्जुनकडे पाहून ते समाधान मानून घेतात आणि काय करणार दुसरे ?



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!